ईशान्य ओहायो मराठी मंडळ


# ज्योती

दिवाळी विशेषांक २०१२





Dr Mohan Durve



Mr Narayan Dravid



Mr Sudarshan Sathe

2012 NEOMM Board of Trustee




Dr Ashok Patil Dr Medha Godbole Dr Mohan Durve

2011 NEOMM Board of Trustee

# कार्यकारिणी २०१२



*अध्यक्ष:*
हिरा राणे



*उपाध्यक्ष:*
तन्मयी दीक्षित



*सचिव:*
सुषमा वानखडे



*सांस्कृतिक कार्यवाह:*
हेमांगी काळे



*कोषाध्यक्ष:*
देवीदास डुंबरे



*वेब मास्टर:*
विशाल खापरे



*ज्योती संपादक:*
शुभदा पेंडसे



**ज्योती दिवाळी विशेषांक २०१२**

**मुखपृष्ठ मॉडेल:** उमा दीक्षित
**जाहिरात सजावट:** हिरा राणे
**मुखपृष्ठ रचना:** विशाल खापरे
**संपादक:** शुभदा पेंडसे

**प्रकाशक:** नॉर्थ ईस्ट ओहायो मराठी मंडळ

**सहकार्य:** गीता लिमये
सुनेत्रा पाटील
संदीप दीक्षित




**Shimaga Hangama, March , 2012**




**Bowling Tournament, May , 2012**





**Picnic- Ladies Cricket Match at Hinckley Reservation, July , 2012**



**Garden Club Event, May , 2012**



**Girls' Night Out, October , 2012**

**संपादकीय**

नमस्कार मंडळी!

ज्योतीच्या दिवाळी अंकाचे संपादकीय लिहीताना मन संमिश्र भावनांनी भरून आले आहे.

लहान–मोठया सर्वांना ज्योती बद्दल आपुलकी वाटावी, सदस्यांच्या कलांचे प्रदर्शन व रसग्रहण करावे, समान–छंदी लोकांना एकत्र आणावे, पुढील पिढीला प्रोत्साहन द्यावे व मुख्य म्हणजे विचारांची देवाण–घेवाण करण्यासाठी एक व्यासपीठ असावे अशा उद्देशाने या वर्षी ज्योतीच्या संपादनाला सुरुवात केली.

आपण बहुतेक सर्व मराठी शाळेत निबंध, कविता ई. थोडेसे लिहितोच. काही जणांना लेखनाची आवडही असते. पण शिक्षण–व्यवसायाच्या निमित्ताने ती हरवून जाते. पुढे–पुढे इंग्रजी वाङःमयाचीच आवड लागते व मराठी वाचण्याचीही सवय जाते. मराठी लिहिणे तर दूरच. रोजच्याच धकाधकीत वेळ आहे कोणाला?

त्यामुळे साहित्यासाठी आवाहन केले तेंव्हा काय प्रतिसाद मिळेल याबद्दल धाकधूकच होती. आनंदाची गोष्ट म्हणजे लहानांपासून जेष्ठांपर्यंत, नवख्या व अनुभवी लेखकांकडून भरगोस प्रतिसाद मिळाला. वेळात वेळ काढून मंडळींनी साहित्य पाठविले. माजी समिती–सदस्यांनी अतिशय तत्परतेने जी लागेल ती मदत केली. आपल्या सर्वांच्याच आपुलकी व सहकार्याने ज्योतीचा हा दिमाखदार दिवाळीअंक प्रकाशीत करणे शक्य झाले आहे. आपल्या सर्वांचे मनःपूर्वक धन्यवाद!

ज्योतीचे व्यासपीठ आपल्यासारख्या हौशी, उत्साही, नवख्या, अनुभवी लेखक–लेखिकांसाठी खुले आहे. आगामी वर्षांत आपण सर्व असाच जरुर भाग घ्याल अशी खात्री आहे.

ज्योतीच्या सर्व वाचकांना व लेखकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

**–शुभदा पेंडसे**

**अध्यक्षीय** –

First of all let me wish everyone a very Happy Diwali and Prosperous New Year.

This has been one of my most memorable and enjoyable years in recent times. It has also been a very busy year and I did not realize how fast it has gone by and it is time to welcome 2013.

Altogether we did 9 events this year and all that was possible due to the amazing, talented and co-operative team of people we have in our committee. I want to sincerely thank each and every member of the committee, their spouses and kids without whom nothing could have been accomplished. Everyone was very sincere and very punctual in their attendance for all the events and for all the meetings. They came with lot of energy, ideas & commitment to make every event successful.

We decided early on that we should have events which could be enjoyed by all age groups. So we did bowling and garden club events in May. Both had very good attendance and received very good feedback.

In fact, we noticed above average attendance for all of our events. This year we were also able to do 2 non-traditional events *Pratapgadache Mantra Yuddha* by Rahul Solapurkar and *Ek Hotya Shanta Bai* by Milind Oak and his team. These two events had a special significance, based on historical icons and very close to the hearts of Maharashtrians.

I wish all the best to our president and committee members for next year. I am sure they will have the same success for next year.

**-Hira Rane**

**संपादकीय**

नमस्कार मंडळी!

ज्योतीच्या दिवाळी अंकाचे संपादकीय लिहीताना मन संमिश्र भावनांनी भरून आले आहे.

लहान–मोठया सर्वांना ज्योती बद्दल आपुलकी वाटावी, सदस्यांच्या कलांचे प्रदर्शन व रसग्रहण करावे, समान–छंदी लोकांना एकत्र आणावे, पुढील पिढीला प्रोत्साहन द्यावे व मुख्य म्हणजे विचारांची देवाण–घेवाण करण्यासाठी एक व्यासपीठ असावे अशा उद्देशाने या वर्षी ज्योतीच्या संपादनाला सुरुवात केली.

आपण बहुतेक सर्व मराठी शाळेत निबंध, कविता ई. थोडेसे लिहितोच. काही जणांना लेखनाची आवडही असते. पण शिक्षण–व्यवसायाच्या निमित्ताने ती हरवून जाते. पुढे–पुढे इंग्रजी वाङःमयाचीच आवड लागते व मराठी वाचण्याचीही सवय जाते. मराठी लिहिणे तर दूरच. रोजच्याच धकाधकीत वेळ आहे कोणाला?

त्यामुळे साहित्यासाठी आवाहन केले तेंव्हा काय प्रतिसाद मिळेल याबद्दल धाकधूकच होती. आनंदाची गोष्ट म्हणजे लहानांपासून जेष्ठांपर्यंत, नवख्या व अनुभवी लेखकांकडून भरगोस प्रतिसाद मिळाला. वेळात वेळ काढून मंडळींनी साहित्य पाठविले. माजी समिती–सदस्यांनी अतिशय तत्परतेने जी लागेल ती मदत केली. आपल्या सर्वांच्याच आपुलकी व सहकार्याने ज्योतीचा हा दिमाखदार दिवाळीअंक प्रकाशीत करणे शक्य झाले आहे. आपल्या सर्वांचे मनःपूर्वक धन्यवाद!

ज्योतीचे व्यासपीठ आपल्यासारख्या हौशी, उत्साही, नवख्या, अनुभवी लेखक–लेखिकांसाठी खुले आहे. आगामी वर्षांत आपण सर्व असाच जरुर भाग घ्याल अशी खात्री आहे.

ज्योतीच्या सर्व वाचकांना व लेखकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

**–शुभदा पेंडसे**

**अध्यक्षीय** –

First of all let me wish everyone a very Happy Diwali and Prosperous New Year.

This has been one of my most memorable and enjoyable years in recent times. It has also been a very busy year and I did not realize how fast it has gone by and it is time to welcome 2013.

Altogether we did 9 events this year and all that was possible due to the amazing, talented and co-operative team of people we have in our committee. I want to sincerely thank each and every member of the committee, their spouses and kids without whom nothing could have been accomplished. Everyone was very sincere and very punctual in their attendance for all the events and for all the meetings. They came with lot of energy, ideas & commitment to make every event successful.

We decided early on that we should have events which could be enjoyed by all age groups. So we did bowling and garden club events in May. Both had very good attendance and received very good feedback.

In fact, we noticed above average attendance for all of our events. This year we were also able to do 2 non-traditional events *Pratapgadache Mantra Yuddha* by Rahul Solapurkar and *Ek Hotya Shanta Bai* by Milind Oak and his team. These two events had a special significance, based on historical icons and very close to the hearts of Maharashtrians.

I wish all the best to our president and committee members for next year. I am sure they will have the same success for next year.

**-Hira Rane**

पालखीचा पहिला मुक्काम पुण्यात त्यांच्या आजोळघरी गांधीवाडयात असतो. रात्री राहुटया बांधून त्यात दहा–पंधरा लोक एकत्र राहतात. सकाळी उठून अंघोळ–हरिपाठ करून पुन्हा मार्गाला लागतात. सर्व दिंडया वाखरीला एकत्र येतात. वाखरीला एक महत्वाचा कार्यक्रम असतो– रिंगण. सर्व लोक एकत्र बसतात आणि मधे वीस फुट रूंद रस्ता सोडतात. नंतर माउलीचा अश्व पाच प्रदक्षिणा घालतो. त्याच्या टापांखालील माती लोक आशीर्वाद म्हणून डोक्याला लावतात.

आळंदीहून ज्ञानेश्वरांची व देहूहून तुकारामांची पालखी साधारण २४० किलोमीटरचा प्रवास करून १८ दिवसांत पंढरपूरला पोचते. आळंदीच्या देवळात सुवर्ण–पिंपळाचे झाड आहे. असे म्हणतात की ज्ञानेश्वरांच्या आईने त्या पिंपळाला सव्वा लाख प्रदक्षिणा घातल्या. ते अंतरही २४० किलोमीटर भरते.

संपूर्ण महाराष्ट्रातून सर्व संतांच्या पालख्या आषाढी एकादशीला पंढरपूरला पोचतात. भारताच्या इतर भागातूनही संत, महंत, ऋषी पंढरपूरला येतात. दिंडी ज्या ज्या गावात थांबते त्या गावातील लोक अन्नदान करतात. इतर छोटया दिंडया आपल्या वारकरयांची काळजी घेतात.

वारी हे वारकरयाचे कर्तव्य आहे आणि तोच त्याचा धर्म आहे. लाखो वारकरी ऊन, वारा, पाऊस, सोय–गैरसोय याचा विचार न करता भजनात तल्लीन होऊन वारीबरोबर चालत जातात आणि आजूबाजूच्या भौतिक जगाला विसरतात.

असंख्य टाळांचा गजर गगनाला भिडतो. सर्वत्र "जय जय राम कृष्ण हरी" असा जयजयकार घुमतो. संतजन, भक्तजन, सर्व जण सामुदायिक फुगडया घालून या रसमय वातावरणात तल्लीन होऊन जातात.

तुकाराम महाराज म्हणतात "पंढरीची वारी जयांचिये घरीं, पायधुळी शिरीं वंदिन त्यांची". ही परंपरा आजही गावां–गावांत दिसते. वारकरी जेंव्हा वारीहून परत येतो तेंव्हा गावातील लोक त्यांच्या पाया पडतात.

वारी म्हणजे महाराष्ट्राला लाभलेला शेकडो वर्षांचा धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक वारसा आहे.

दिंडीतील पताका भगव्या रंगाची असते. भगवा रंग हे त्यागाचे प्रतिक आहे. लग्न झाल्यावर स्त्री आपल्या माहेरचा त्याग करून सासरी जाते आणि त्याचे प्रतिक म्हणून कुंकू लावते. भारत हा त्यागाचा देश आहे. वारी हे त्यागाचे प्रतिक आहे. सर्व बंधनातून मुक्त होऊन लोक देवाच्या भेटीला जातात. त्यागामधेच खरे सुख आणि शांती आहे. आजच्या कलियुगात खरोखर सर्वांना एकदा तरी वारी करण्याची गरज आहे.

**–देविदास डुंबरे**

## पंचेचाळीस वर्षे

काळावरला तरंग होतो
भरकटलेला पतंग होतो
आसमंती वाहणारा
जीवनाचा रंग होतो

वास्तवाची रीत होतो
स्वप्नातली प्रीत होतो
मनात रेंगाळलेले
ते अधूरे गीत होतो

चंद्रातला अंधार होतो
उजेडाचे दार होतो
समजले कमी तरी
बोललो मी फार होतो

जळणारे रक्त होतो
दु:खांचा भक्त होतो
सगळे होते शहाणे
वेडा मी फक्त होतो

काय मीही चिज होतो
कोसळणारी वीज होतो
काल ज्याला पाहिले
काय तोही मीच होतो

**–मिलींद देवगांवकर**

## अर्जुन उवाच !

(एकविसाव्या शतकातील अर्जुनाचा श्रीकृष्णाला उपदेश)

तूच सांग देवा तुझा सल्ला कसा घेऊ?
अन सोडून सारे धर्म तुला शरण कसा येऊ?
बांधव माझे समोर त्यांना असेच कसे मारू?
कशी वाट स्वर्गाची मी चित्रगुप्ताला विचारू?

वर स्वर्गामध्ये म्हणे सुंदर अप्सरा नाचती
अन लेउनी कंचुकी पारिजातक वेचती
तेथे कल्पवृक्ष आहे मिळे जन जे मागती
त्याचे सुख कसे वर्णू तू रे सामान्य सारथी

नित्य मिळे तेथे प्याया सर्वा अमृताचे घोट
बिनाभेसळ दुधाचे क्षीरसागराचे लोट
नको राज्य भारताचे इथे दारिद्र्य बेकारी
जरी वेदांची श्रीमंती तरी मनाने भिकारी

अर्धी माणसे उपाशी तरी धान्याची निर्यात
आणि राष्ट्राचे उत्पन्न इथे नेत्याच्या खिश्यात
राष्ट्रपिता गांधी जरी इथे यादव चिकार
भ्रष्टाचार हा सद्‌गुण, अन सभ्यता विकार

"इन्फोसिस" नारायण हाच परम ईश आज
भवसागर तारण्या कॉल सेंटर जहाज
गीता सांगण्या कशास वेळ वृथा दवडावा
संगणक ज्ञान आता तुही शिक रे माधवा

ओबामाची कृपादृष्टि मग व्हिसाही मिळेल
ग्रीनकार्ड उपासनेचीही महती कळेल
एक तपाची पूर्णता होय ग्रीनकार्ड प्राप्ती
साठा उत्तरी कहाणी पाचा उत्तरी समाप्ती

- जय मसुरेकर

## सामांन्यांची लढाई

डोळ्यात माझ्या जाग आहे
हृदयात अजूनी आग आहे
कोरड्या वाळवंटात या
एक हिरवी बाग आहे

युध्दात या पडले कीती
भोवताली वीर माझ्या
मशालीत आघाडीवर
त्यांच्या चितांची आग आहे

कापलेले हात अन
शिणलेली शरिरे जरी
रक्तात अजुनी उफाळतो
तो मनातील राग आहे

रस्त्यात येती अडथळे
पायात नाही त्राण ही
थांबला तो संपला
चालणे हे भाग आहे

सोडवू सुर्यास आम्ही
कैदेतून अंधाराच्या
सामांन्यांची ही लढाई
साध्याच स्वप्नांचा माग आहे

**–मिलींद देवगांवकर**

## कमावलं कि गमावलं

यशामागे धावून आम्ही कमावलं कि गमावलं
आयुष्याचं गणित आता पैशामध्ये सामावलं
आईच्या पदराची मग किमत किती लावायची
आजीची गोधडी आता कुठल्या दुकानी गावायची
आजोबांच्या गोष्टी मधले राजा राणी गेले कुठे
चष्म्यामागून वटारलेले प्रेमळ डोळे गेले कुठे
पाठीवरती धम्मकलाडू बाबान्कडून बसत नाहीत
नमस्कार करण्यासारखे पायच आता दिसत नाहीत
दोन खोल्या पाच माणसे अडचण कधीच भासली नाही
महिनाअखेर जेमतेम पोचून चणचण कधीच भासली नाही
गाडी, बंगला, पैसे नव्हते विचारांची वाट होती
फाटक्यातुटक्या आयुष्याला आपुलकीची गाठ होती
फुगण्यामध्ये खिसा आता स्पर्धा करतोय पोटाशी
बंगला गाडी छानछोकी सवय लागली कोटाची
यंत्रामधल्या गार हवेत उब शोधतो मायेची
मद्यामध्ये बुडली तलफ दुधावरल्या सायेची
मिडाससारखे आयुष्याचे सोने करण्या कसलो मी
किमती गोष्टी जमवताना मूल्यच हरवून बसलो मी
रीतीभाती विसरुन साऱ्या, घरे रिती मने रिती
जमवलेल्या गर्दीमधले खरे किती खोटे किती
हवे तेवढे पैसे देईन किमत फक्त कळेल काय
आईच्या कुशीत परत झोपायला मिळेल काय

-जय मसुरेकर

## आपले नातेसंबंध

प्रत्येक कार्य किंवा नातेसंबंध यशस्वी होण्यासाठी तसेच मनाची शांति टिकवण्यासाठी सारासार विचार करून हे ठरवणे महत्वाचे आहे कि त्यात किती गुंतुन रहायचे.

ज्याप्रमाणे एक माळी योग्यवेळी बी पेरतो, त्याला खत/पाणी घालतो आणि योग्य ती काळजी घेउन त्यापासून दूर राहतो. इतर सगळ तो निसर्गावर सोपवतो.
कुठ्ल्याही अपेक्षेविना आणि घाई न करता त्याला हे पक्क माहित असत की बीजा पासून रोप येणे, त्याचे झाड होणे हे फक्त त्याच्यावर अवलंबुन नाही.
त्याचवेळी त्याला हे ही माहित असते कि त्याने योग्य काळजी घेतली नाही तर त्या रोपाची वाढ होणार नाही.
निसर्ग आणि त्याच्या परसपर सहकार्यामुळेच एका बीजाचे डौलदार वृक्षात रुपांतर होणार असते.
नात्यात आपले भाव चांगले असतात पण काही चुकांमुळे नाती बिघडतात. कधी आपण दुसरयावर अधिकार गाजवतो, कधी सहन करीत राहतो तर कधी कधी नातीच तोडुन टाकतो.
अश्या टोकाच्या भूमिकेमुळे आपल्याला नात्यात यश लाभत नाही आणि आपण हताश होतो.
थोडक्यात, नातेसंबंधांची काळजी घेणे आणि त्यानुसार व्यवहार करणे हे महत्वाचे आहे. त्यामुळे संतुलन राहते आणि मनाला शांति लाभते.
काळजी घ्या पण काळजी करु नका.

आपणही आपले नातेसंबंध असेच जपले तर? त्यांची अशीच काळजी घेतली तर?

**लेखिका :- गौरी चितळे / कायंदे**
संदर्भ :- ब्रह्माकुमारी राजयोग

## नारदोपदेशातील राजनीति कीं पुराणातली वांगी ...

जुनं ते सोनं याऐवजी जुनं ते उणं असाच कांहींसा समज असावा असं कधीकधी मला वाटायला लागतं. महाभारताची तीच गत. एक भगवद्गीता सोडून बाकी सर्व सुरस कथा असते. त्यातील मनोरंजक प्रसंगांची मालिकाच महाभारत मालिकेत दिसते, पण कांहीं भाग मालिकेत दाखवायला वेळखाऊ असतात व तसे दाखवण्याची शक्यता शून्यच. असो, अशा कांहीं प्रसंगांतील हा एक इथे सादर केला आहे.

वारणावतातील अग्निदिव्यातून वाचलेले पांडव द्रौपदीसह हस्तिनापुरात आले. पुन्हा एकदा ते अन्याय, सामोपचाराच्या नांवाखाली, सहन करून खांडवप्रस्थास गेले. श्रीकृष्णाच्या सल्ल्यानें व आशीर्वादानेही इन्द्रप्रस्थ वसवून साम्राज्यही निर्माण केले. आता राजसूय यज्ञाचा थाटमाट. त्याचेही रसभरित दर्शन, शिशुपाल वधासह, आपण महाभारत मालिकेत पहिले. नाही पाहिला तो युधिष्ठिरास नारदमुनींनीं केलेला उपदेश.

राजनीतीचे पूर्ण ज्ञान असलेला युधिष्ठिर आता राज्य कसे करतो त्याची केवळ दुरून गंमत न पाहतां, त्याला त्याच्या ज्ञानाची पूर्ण आठवण व ओळखच जणू करून देण्याचे त्यांनी मनावर घेतले होते. नारदमुनीच ते. आले. त्यांचा यथायोग्य स्वागत-आदरसत्कार सर्व आटोपल्यावर त्यांनी आपणहोऊन उपदेशास सुरुवात केली. उपदेशही कसा तर सर्व केवळ प्रश्नात्मक. म्हणजे कसे कीं राजनीतीचे सर्व धडे युधिष्ठिराने गिरवले असले तरी ते लक्षांत ठेवून प्रत्यक्ष अंमलात आणण्याची वेळ आली होती . त्या सर्व नीतीची जाणीव व पुन्हा आठवण दिली ती कशी तर जणू त्या प्रत्येक धड्याचा सारांशात्मक प्रश्न विचारून, आणि विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तराची वाट न पाहता. म्हणजे राजनीतीची उजळणी प्रश्नरूपाने केली. जागेअभावी पूर्ण अध्याय देण्याऐवजी आजही उपयुक्त असलेली निवडक प्रश्नावली आपण बघू. धर्माचरणाचे अनेक प्रश्न होतेच व "यथा राजा तथा प्रजा" या न्यायाने आचरणांत येणे आवश्यक होतेच, ते येथे देण्याची आवश्यकता वाटली नाही.

आधी विचार होता की प्रत्येक श्लोकाच्या अर्थासोबत त्याचे अधिक स्पष्टीकरण द्यावे. पण लिहू जातां असे लक्षांत आले की त्याची कांहींच आवश्यकता नाही. वाचक सूज्ञ आहेत. त्यामुळें मूळ संस्कृत श्लोक न देता त्यांचा मराठी अनुवाद गीताप्रेस, गोरखपूर, यांच्या हिंदीतील प्रतीमधील अनुवादाच्या आधारे दिला आहे.

**महाभारत पर्व २रे सभापर्व ।**
**अध्याय ५वा लोकपालसभाख्यानपर्व ॥**

**श्लोक १७:** नारद म्हणाले - हे राजा, तुझे धन तुमच्या निर्वाहाला पुरेसे आहे ना? धर्मपालनांत तुझे मन (प्रसन्नतापूर्वक) रमते ना? तुझ्या मनावर आकस्मिक आघात तर होत नाहीत ना ?

**श्लोक १९:** अर्थामुळे (धनाच्या लोभाने) धर्माला, धर्माने (म्हणजे त्याच्या अतिरेकाने) अर्थाला किंवा आसक्तीचे मूळ असलेल्या कामभोगाने (धर्म व अर्थ या) दोघांसही बाधा होत नाही ना ?
आचार-विचारांचा सर्वतः समतोल हवा.

**श्लोक २१:** राजाला उचित अशा सहा गुणांयोगे, सात उपायांद्वारा (स्वतःच्या व शत्रूच्या) बलाबलाची चौदा विषयीं नीट परीक्षा करतोस ना ?

*(सहा गुण : व्याख्यानशक्ति, प्रगल्भता, तर्ककुशलता, भूतकालाची स्मृति, भविष्याचे भान व नीतिनिपुणता;*
*सात उपाय : मन्त्र, औषध, इन्द्रजाल, साम, दान, भेद, दंड;*
*आणि चौदा विषय : देश, दुर्ग, रथ, हत्ती, घोडे, शूर सैनिक, अधिकारी, अन्तःपूर, अन्न, गणना, शास्त्र, लेख्य, धन व बल;*
*हे विस्तारानें हिंदी अनुवादात आहे त्यानुसार.*
*याचा अर्थ असा कीं अशी राजनीति युधिष्ठिर आणि सर्वच कौरव, म्हणजे ५ पांडव व १०० धार्तराष्ट्र (दुर्योधन वगैरे) मिळून १०५ राजकुमार, शिकले होते. नारदमुनि युधिष्ठिराला नुसत्या निर्देशाने सर्व शिकलेल्या विद्येची आठवण करून देत होते.)*
*(साधनांची परिभाषा वेगळी असली तरी सर्वांगीण विचार करण्याची आवश्यकता बदलत नाही. आणि कालानुसार अशा कोणत्या सर्व अंगांची कोणत्या सर्व उपायांनी परीक्षा व्हायला हवी एवढेच ठरवायचे उरते.)*

**श्लोक २४:** ज्यांची तुला शंकाही येत नाही असे शत्रूचे गुप्तचर कृत्रिम मित्र बनून तुझ्या मंत्र्यांशी होणाऱ्या तुमच्या गुप्त मन्त्रणा (सल्लामसलत) जाणून घेऊन (शत्रूला) कळवत तर नाही ?

**श्लोक २६-२७:** तुला उदासीन (neutral), मध्यम (कांहीं अंशीं favorable) या लोकांशी कसे वागावे याचे अनुमान आहे ना ? तू स्वतःप्रमाणेच विश्वसनीय, शुद्ध मनाचे, परिस्थितीची उत्तम समज करून घेण्यास समर्थ, कुलीन आणि तुझ्यावर प्रेम असणारे असेच पुरुष मन्त्री नेमले आहेस ना ? कारण उत्तम मंत्रणेतच (राजाचे व राज्याचे) विजय व सुरक्षा आहेत.

**श्लोक २९:** तू अकाली निद्राधीन (असावधान) होत नाहीस ना? वेळीच जागा राहतोस ना? तू अर्थशास्त्र जाणतोसच. तू रात्रीच्या उत्तरप्रहरात (पहाटे) अर्थाचा (आवश्यक कर्तव्य व हित यांचा) विचार करतोस ना ?

**श्लोक ३१:** धनवृद्धीचा निश्चय करून, ज्यात थोडे मूळ धन (initial investment) योजून त्यात वाढ अधिक होते असे उद्योग त्वरेने हाती घेतोस ना ? अशा कामांत वा अशा कामांत लागलेल्यांच्या मार्गांत तू विघ्न तर आणीत नाहीस ना ?

**श्लोक ३२:** तुझ्या राज्यातले कर्मचारी तुझ्याकडून दुर्लक्षित नाहीत ना ? त्यांच्या कामावर तुझे लक्ष असते ना ? त्यांना कामावर घेणे व काढणे असे तर पुन्हापुन्हा करीत नाहीस ना ? त्यांच्या सहयोगातच उन्नति आहे.

**श्लोक ३६:** तुझे सर्व दुर्ग धन-धान्य, अस्त्र-शस्त्र, जल, यन्त्र, शिल्पी (engineer) व धनुर्धर यानीं भरले आहेत ना ?

**श्लोक ४३:** उत्तम (लोक) महत्त्वाच्या, मध्यम (लोक) मध्यम प्रकारच्या व निम्नश्रेणीयांना निम्न दर्जाच्या कार्यांत योग्यतेप्रमाणे नेमतोस ना ?

**श्लोक ४५-४६:** कठोर दंडाद्वारा तू प्रजाजनांस उद्वेग तर देत नाहीस ? तुझे मंत्री अनुशासन नीट (न्यायपूर्वक) करतात ना ? याजक (पुरोहित) अधःपतित यजमानाचा किंवा स्त्रिया अतिकामातुर पुरुषाचा जसा तिरस्कार करतात तसा तुझे प्रजाजन कठोरपणे कर घेण्याविषयी (म्हणजे लोभाने अतिशय कर लादल्यामुळे) तुझा तिरस्कार करीत नाहीत ना ?

**श्लोक ४९-५०:** आपल्या सैनिकांस यथोचित भोजन आणि वेतन वेळच्यावेळी देतोस ना ? त्यात चालढकल तर करीत नाहीस ना ? भोजन आणि वेतनांत विलम्ब झाल्यास त्यांना क्रोध येतो कीं जो अनर्थाचे कारण म्हटला जातो.

**श्लोक ५३:** कोणी पुरुष लक्षणीय पुरुषार्थ करून कार्य संपन्न करतो तेव्हां त्याचा विशेष सन्मान करून अधिक वेतनही देतोस ना ?

**श्लोक ५५:** जे तुझ्या हिताच्या कारणी मृत्यु स्वीकारतात किंवा भयानक संकटांत पडतात त्यांच्या बायका-मुलाबाळांचे तू भरण-पोषण करतोस ना ?

**श्लोक ६२:** शत्रूंवर आक्रमण करण्यापूर्वी साम, दान भेद व दंड हे योग्य रीतीने वापरलेले गुण (उपाय) शत्रूपर्यन्त पोहेचतात ना (शत्रूंवर योजले जातात ना)?

**श्लोक ७१:** तुझा आय (income) आहे त्याच्या पाव, अर्ध्या वा पाऊण हिश्श्यात व्यय (expense) नीट भागतो ना ?

**श्लोक ७३:** तुझे आय-व्यय लेखक (कारकून) आणि गणक (accountant) तुला दैनंदिन हिशोब सकाळच्या प्रहरी देतात ना ?

**श्लोक ७५-७७:** तू उत्तम-मध्यम-कनिष्ठ माणसे नीट ओळखून त्यांच्या योग्यतेप्रमाणे कामांवर नेमतोस ना ? चोर, लोभी, शत्रुत्व बाळगणारे किंवा अननुभवी अशा लोकांनां तुझ्या कामीं नेमत नाहीस ना ? चोर व लोभी (असे दोन्ही प्रकारे लोकांनां लुबाडणारे) तसेच राजकुलातील कुमार वा स्त्रिया वा तू स्वतः यांजकडून राष्ट्राला (प्रजेला) पीडा तर होत नाही ना ? तसेच शेतकरी संतुष्ट आहेत ना ?

**श्लोक ७८-७९:** तुझ्या राष्ट्राच्या सर्व भागांत पाण्याने भरलेले मोठे तलाव आहेत ना ? केवळ पावसाच्या पाण्यावर शेती अवलंबून नाही ना? शेतकऱ्यांचे (खायचे) अन्न व (शेतीचे) बीज नष्ट तर होत नाही ना ? शेतकऱ्यांनां एक टक्का व्याजाने ऋण देण्याचा अनुग्रह करतोस ना ?

**श्लोक १०५-१०६:** असे तर होत नाही ना कीं विद्वानांची संगति न कणारे मूर्ख मंत्री शुद्धचरित्र पुरुषावर चोरीचा आरोप करून त्यांचे धन हडप करतात वा त्याही पलीकडे जाऊन अधिक लोभामुळे त्याला प्राणदंडही देतात? आणि असे तर नाही कीं कोणा दुष्ट चोराला (चोरी केल्यावर) मालासकट तुझ्या अधिकाऱ्यानें पकडूनही धनाच्या लोभानें (लांच घेऊन) सोडले जाते ?

**श्लोक १०८-११०:** युधिष्ठिरा, राजासंबंधी जे चौदा दोष आहेत - नास्तिकता, खोटेपणा, क्रोध, प्रमाद (काय करू नये ते कळत असतानां ते नेमके करणे), दीर्घसूत्रता (चालढकल करण्याची वृत्ती), ज्ञानी लोकांचा संग न करणे, आळशीपणा, इंद्रियविषयांची आसक्ति (आणि त्यांमुळे सदसद्विवेकबुद्धीला भ्रम होणे), प्रजेविषयी एकट्यानेच विचार करणे (जाणकारांबरोबर विचारविनिमय नाही), अर्थशास्त्रात अज्ञान्याशी अर्थविषयक चर्चा करणे, निश्चित कार्यात विलंब करणे, गुप्त मन्त्रणेची असुरक्षा, मंगल उत्सव न करणे, अनेक शत्रूंवर एकाच वेळी चढाई करणे - ते टाळतोस ना ?

**श्लोक ११५-१६६:** (राष्ट्रासाठी) कर वसूल करणारे

(तुझे कर्मचारी) लाभासाठी (व्यापारास) दुरून आलेल्या व्यापाऱ्यांकडून सांगितल्याप्रमाणे योग्य कर वसूल करतात ना ? हे राजा, असे नगरात व राष्ट्रात मान्यता पावलेले व्यापारी विक्रीसाठी उपयोगी वस्तु आणतात ना ? ते तुझ्या कर्मचाऱ्यांपासून छलकपटमुक्त आहेत ना ?

**श्लोक ११९:** तुझ्या राज्यात शिल्पींना (engineers) नियमितपणे उत्पादनकार्यासाठी चार महिन्यांची साधनसामग्री सतत पुरवतोस ना ? (supply chain)

**श्लोक १२५:** हे धर्म जाणत्या राजा, तू अंध, मुके, पांगळे व अनाथ अशांना तसेच संन्यासव्रतधाऱ्यांनाही पित्याप्रमाणे सांभाळतोस ना ?

हा उपदेश आपल्याला वाचायलाही मनोरंजक आहे. तो भारताच्या व इतर देशांच्याही राज्यकर्त्यांच्या नजरेस पडो वा त्यांतील उपयोगी भागाचा सर्वांनां लाभ होवो हीच दिवाळीनिमित्त सदिच्छा.

**-कौस्तुभ लेले**




**Ganeshotsav – September 2012**
**Sangeet Mehfil by Asha Dandekar**

# उद्याचे दिर्घायु जरानाशी

वाढता जगी आयुर्मान, गणती वृद्धांची वर्धमान
सांधेदुखीचे पार्श्वगान, अधू दृष्टी दात नि कान
हृदयरोगाने कासावीस प्राण, मधुमेह दमवितो हरतो त्राण
कर्करोगाची चढती कमान, स्मृतिभ्रष्टांचे हरपते भान.

होता प्राणी वयोवृध्द, अवयव सगळे होती कृध्द
जीवन सारे स्थानबध्द, "अर्थ" हीन जगणे अशुध्द
लेक नि सुना उभे विरुध्द, स्वार्थातची असती मंत्रमुग्ध
कर्तव्याची जरा न शुध्द, अपमानाने थोर हो विध्द.

अनुभवी व्यक्तींचे बोल, मार्गदर्शक ठेवा अमोल
नियोजिनी उर्वरीत काळ, ओळखून वार्धक्याची चाल
कार्यरत नेटकी वाटचाल, दूर ठेवी आरोग्य सवाल
करूनी जेष्ठां सुविधा बहाल, बिघडू न द्यावा सूर-ताल.

देशोदेशीच्या राजकर्त्यांचे, मोठे कार्य संधी निर्मितीचे
दारिद्र्य निवारण ज्येष्ठांचे, "निवृत्ति-वेतन" सरकारांचे
उत्पन्न रोजचे पन्नासांचे, स्वप्न पुरे रहाणीमानाचे
अन्न, औषध निवाऱ्याचे, सत्यात उतरणे बहू मोलाचे.

पूर्वीचे साठ आत्ताचे ऐंशी, उद्याचे दीर्घायु जरानाशी
नवनवे शोध असता पाठीशी, उपचारांच्या सुविधा खाशी
जनुकीय लढा चालू मृत्यूशी, जन्म मरण चक्राच्या गतीशी
उत्क्रांत मानव निर्मिती ऐशी, आत्म्यापरी काया हो अविनाशी.

**–डॉ. आशा प्रतिनिधि**
**७.०४.२०१२**

(जागतिक आरोग्य संघटने तर्फे (WHO) दर जागतिक आरोग्य दिनी (World Health Day) एक घोषवाक्य देतात आणि त्यावर निरनिराळे कार्यक्रम आयोजित केले जातात आणि त्या विषयावर जनजागृती केली जाते. ह्या वर्षीचे घोषवाक्य "वार्धक्यामधे आपली वाटचाल बदलणे" (Aging and Life Course) असे होते. त्यावर केलेली ही कविता आहे.)

# यादी

आधुनिक माणसाला ज्या काही सवयी- किंवा मी म्हणेन व्यसनेच-लागलेली आहेत त्यांपैकी एक व्यसन म्हणजे यादी करण्याचे व्यसन. मला वाटते आजचा माणूस या याद्याशिवाय जगूच शकणार नाही. तो कशाकशाची यादी करेल याचा विचार केला तर तीच एक भली मोठी यादी तयार होईल. आता आपल्या नेहमीच्या व्यवहारातल्या याच याद्या बघा ना: वाण्याच्या सामानाची यादी; रोज सकाळपासून रात्रीपर्यंत करायच्या गोष्टींची यादी; घरी मुले असल्यास त्या प्रत्येकाने दिवसभर करायच्या गोष्टींची यादी; मुलानी शाळेत घेऊन जायच्या गोष्टींची यादी; एखाद्या मुला/मुलीचा वाढदिवस असला तर त्यावेळी बोलवायच्या त्याच्या/तिच्या मित्र-मैत्रिणींची यादी; त्यांना द्यायच्या भेटवस्तूंची यादी; वाढदिवसाला करायच्या पदार्थांची आणि त्यासाठी लागणाऱ्या वस्तूंची यादी; आपण घेत असलेल्या औषधांची यादी; डॉक्टरकडे जायचे असल्यास त्याला विचारायच्या प्रश्नांची यादी; वगैरे, वगैरे.

घरी लग्न-मुंजीसारखे कार्य असले तर या याद्यांचा जो गोंधळ उडतो तो वेगळाच. खूपच ओळखी असल्या तर मग लोकांना बोलवायचा आकडा आणि होणारा खर्च याचा मेळ घालणे कठीण होऊन बसते. मग या याद्यांची एकाबाहेर एक वर्तुळे तयार होतात. अगदी आतल्या वर्तुळात जवळचे नातेवाईक आणि घनिष्ट मित्रमंडळी; त्याबाहेरील वर्तुळात जरा दूरचे नातेवाईक आणि यथा-तथा मैत्री असलेली मंडळी; त्याही बाहेरच्या वर्तुळात *केवळ शिष्टाचार म्हणून यांना बोलावणे जरुरीचे आहे परंतु न आले तर पीडाच गेली* अशा लोकांची यादी. मग यातील कुठल्या वर्तुळात कुणाला बसवायचे यावरून लग्नघरातील मंडळींचे वादविवाद होऊन प्रकरण विकोपाला जाते. शिवाय बोलावलेल्या मंडळीपैकी ज्यांना आहेर करायचाय त्या लोकांची आणि त्या प्रत्येकाला देण्याच्या भेटवस्तूची यादी यावर पण चर्चा-वादविवाद-भांडणे झालेली मी बघितलीत.

या झाल्या नेहमीच्या कौटुंबिक गोष्टीसंबंधींच्या याद्या. जगभर प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांचा विचार केला तर डोकेच फिरून जाईल. दरवर्षी जगातील सर्व देशात मिळून वीस लाखांच्यावर नवीन पुस्तके लिहिली जातात. त्यात अमेरिकेचा नंबर पहिला लागतो. इथे दर वर्षी तीनशे हजारावर पुस्तके प्रसिद्ध होतात. आपल्या भारतात ऐशी हजाराच्यावर पुस्तके दर वर्षी प्रसिद्ध होतात. भारताचा नंबर सातवा लागतो. या सर्व पुस्तकांची यादी तयार केली तर पाचशे पानांची तीन हजार पुस्तके तयार होतात. मग त्या याद्यांच्या पुस्तकांची यादी. अमेरिकेतील लायब्ररी ऑफ कॉंग्रेसने हा उपक्रम केलेला आहे म्हणे. एकोणीसशे पासष्टमधे गॉर्डन फॉस्टर या डब्लिनमधील प्रोफेसरने जगातील प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक पुस्तकाला एक विशिष्ट नंबर बहाल करण्याची कल्पना काढली आणि त्यातून ISBN (International Standard Book Number)चा उगम झाला. सुरुवातीला त्यात नऊ आकडे होते. ते वाढत वाढत आता तेरा आकड्यांचा हा कोड संपूर्ण जगातील प्रत्येक पुस्तकाची नोंद ठेवतो. आज यात कॅसेट, सीडी, डीव्हीडी यांचा पण समावेश होतो. सुमारे तीस वर्षापूर्वी “बार-कोड”चा शोध लागल्यानंतर हे काम खूपच सुलभ झालेले आहे.

माणसाने जगात या एवढ्या अगणित संस्था स्थापन केलेल्या आहेत की त्या सगळ्यांची यादी तयार केली तर ती एका पुस्तकात मावणेही अशक्य. म्हणून त्या

संस्था वेगवेगळ्या गटात विभागून पहिल्या प्रथम त्या गटांच्या नावांची यादी करावी लागेल. मग प्रत्येक गटातील संस्थांची यादी. त्यानंतर प्रत्येक संस्था चालवणाऱ्या लोकांची यादी, वगैरे, वगैरे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे अशा याद्या उपलब्ध आहेत.

एखाद्या डिपार्ट्मेंट स्टोअरचा विचार करा. तिथे मिळणाऱ्या हजारो नव्हे, लाखो वस्तू जगभर तयार झालेल्या असतात. त्यांच्या याद्या त्या त्या धंद्यात असतातच. त्या अगोदर प्रत्येक वस्तू तयार करण्यासाठी जो कच्चा माल लागतो त्यांच्या याद्या.

या यादीच्या संदर्भात एक गोष्ट आठवते. एका नवरा-बायकोला १५-२० मुले असतात. त्यात मुलींचा भरणाच जास्ती असतो. त्यातील काही मुली लग्नाच्या वयाच्या झालेल्या असतात. एक दिवस एक वरपिता आपल्या मुलाला साजेशी मुलगी शोधत शोधत या कुटुंबाच्या घरी येतो. थोडासा पाहुणचार झाल्यानंतर तो वधूपित्याला म्हणतो “माझा एकुलता एक मुलगा आता लग्नाला अनुरूप झालेला आहे. त्याला साजेश्या सुमारे १८ ते २० वयाच्या एखाद्या मध्यम उंचीच्या, काळ्या-सावळ्या, सुशिक्षित आणि देखण्या मुलीच्या शोधात मी आहे.” वधूपिता स्वैपाकघरात असलेल्या त्याच्या पत्नीला जोरात हाक मारून विचारतो, “अग ए, आपल्याकडे लग्नाला अनुरूप अशी एखादी मध्यम उंचीची, काळी-सावळी, सुशिक्षित आणि देखणी मुलगी आहे का?” बिचारा वधूपिता! त्याला आपल्या मुला-मुलींची यादी करण्याचे कधी सुचलेच नाही!

याच संदर्भात अजून एक किस्सा सांगून हे यादी प्रकरण आवरते घेतो.

एकदा भीमसेन जोशींचा शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम संपल्यानंतर एका श्रोत्याने त्याना विचारले, “भीमसेनजी, आपण पहिला जो ख्याल म्हटला त्यातले शब्द मला कळले नाहीत. ते जरा सांगाल का?” भीमसेनजी उत्तरले, “अहो, मला गाणे संपल्यावर बायकोने काही वाणसामान घेऊन यायला सांगितले होते त्याची ’यादी’ मी पाठ करत होतो!”

एकंदरीत काय या ’यादी’ने कुणाचाच पिच्छा सोडलेला नाही!

**-रवि गावकर**





**Pratapgadache Mantrayuddha – May 2012, presented by Rahul Solapurkar**

## परदेशात भेटलेली मराठी माणसे

भारतातून बरेच लोक परदेशात स्थायिक होतात. पण त्यात मराठी लोकांची संख्या फार थोडी असते. परदेशात मराठी बोलणे ऐकले की वेगळाच आनंद होतो.

न्यूझिलंड मधे एका गावी संध्याकाळी जेवायला गेलो असता, ऑर्डर घेणारी मुलगी चक्क मराठीत बोलायला लागली. "आम्ही दोघे हॉटेल मॅनेजमेंटची डिग्री घेऊन इथे आलो. सध्या वेगळ्या वेळी मॅरियॉट हॉटेल मधे अॅसीस्टंट मॅनेजर म्हणून काम करतो. शिवाय मी चार तास या रेस्टॉरंट मधे होस्टेस आहे."

जिब्राल्टरला आफ्रिकेतून इंग्लड द्वारा आलेले बरेच व्यापारी आहेत. कोणते आईस्क्रीम घ्यावे ह्यावर आमचा वाद चालला असता गल्ल्यावर बसलेली बाई मराठीत म्हणाली "मी कोल्हापुरची आहे. मी केलेला कोल्हापुरी चिवडा पण आम्ही विकतो." आम्हाला तिचे कौतुक वाटले.

पॅरीसला आयफील टॉवरवर हजारो लोक जातात. पण तेथे सुद्धा भर रात्री मला लहान मुलांची मराठीत किलबिल ऐकू आली. वळून पाहिले तर दोन तरुण जोडपी मराठीतून बोलत होती. आम्ही पण मराठी आहोत, अमेरिकेतून आलो, आपण कुठले विचारता कळले की ते जर्मनीतून आले होते. लगेच त्यांनी मुलांना आजी–आजोबांना नमस्कार करा म्हणल्यावर कुरकुर वा आढेवेढे न घेता त्यांनी आम्हाला वाकून नमस्कार केला.

शेवटच्या संध्याकाळी पॅरीसला जेवून परत येत होतो. तोच पलीकडून आवाज आला "अहो मी तुम्हाला ओळखतो. तुमच्या मंगळसूत्रावरून तुम्ही मराठी हे ओळखले. मी नागपूरच्या बॅरीस्टर फडक्यांचा मुलगा." मी लगेच चवकशी केली, "तुमची चुलत बहीण चिमी का(माझी शाळेतली मैत्रीण)?" "नाही आम्ही आकोल्याचे फडके. चला आमच्याबरोबर जेवायला." आम्ही आमचे जेवण झाले असे सांगितल्यावर तो म्हणाला "मग नुसत्या गप्पा मारायला चला." मी त्याला त्याच्या आकोल्याच्या नातेवाईकांची पूर्ण माहिती दिली. नंतर तो आपल्या फ्रेंच पिआनिस्ट मैत्रीणीस म्हणाला "तुला लग्नात असेच मंगळसूत्र देणार." श्री फडके हे बॅरिस्टर असून सहा महिने पॅरीस व सहा महिने दिल्लीस व्यवसाय करतात.

मनास हे गाव ब्राझीलच्या दाट जंगलामधे अॅमेझॉन व नीग्रा नदीच्या संगमावर आहे. इथे रबराची सॅप बोटीने येत असे व त्याचे मोठे व्यापारकेंद्र इथे होते. या ठिकाणी फक्त बोटीने किंवा विमानानेच जाता येते. आम्ही तेरा जण ह्या गावी विमानाने येऊन पोहोचलो. आमच्या गाईडने आमचे स्वागत केले व म्हणाली, "हा माझा अॅमेझॉन जंगलातील मदतनीस– परकाश (प्रकाश)." प्रत्येकाशी हस्तंदोलन करत आमच्या जवळ आला तेंव्हा आमचे नाव बघुन मराठीत म्हणाला "प्रवास कसा झाला? माझे आईवडील फाळणीनंतर पुण्यात स्थाईक झाले. त्यामुळे माझी मातृभाषा मराठी." पुढील आठ दिवस आम्हाला रॉयल ट्रीटमेंट तर मिळालीच पण त्याने हमी दिल्यामुळे माझी साप, पिराना वगैरे श्वापदांची आणि मुख्य म्हणजे डांस चावण्याची भीति कमी झाली.

ऑस्लोला नॅशनल आर्ट म्युझीयम पाहिल्यावर आम्ही दमलो होतो. पाऊस पडत होता. मग समोरच्याच भारतीय रेस्टॉरंटमधे जायचे ठरवले. जेवणाचा मेनू वाचून बापूंना काय घेऊ हे सांगत होते. तोच मागून मराठीतून विचारणा झाली " कुठून आलात? काय घेणार? पाऊस आहे तेंव्हा स्टार्टर म्हणून कांद्याची भजी आणू का?"

बापू एकदम खूष! कारण कांद्याची भजी व पाऊस हे समीकरणच आहे. भजी आणल्यावर तो म्हणाला "मी मुळचा बंगलोरचा पण आयुष्य मुंबईतच गेले. त्यामुळे मला मराठी उत्तम येते." कसा आलास हे विचारता तो म्हणाला "माझे काका साठ वर्षांपूर्वी इथे आले व मी तीस वर्षांपूर्वी आलो." शेजारीच बसून खूप गप्पा करत होता. शेवटी बापू म्हणाले " अरे तुझा मालक रागावेल." तेंव्हा तो म्हणाला "अहो, हे माझ्याच मालकीचे रेस्टॉरंट आहे."

आम्ही कुठल्याही देशात गेलो कि आमचे कान मराठी ऐकायला टवकारलेले असतात.

**–मीना गोखले**

*Best Complements from*

# Tamaskar & Associates

## Financial Planning Services

Our Team of Experts Offer:

**Life, Health & Long Term Care Insurance**
**College Education & Planning**
**Pension & Retirement Distributions**
**Estate Planning & Other Financial services**

***ENHANCE YOUR WEALTH BY TAKING ADVANTAGES OF SECTION 419F/S, SECTION 412, SECOND TO DIE POLICY***

***Without wasting time surfing web internet lovers can get better deal on term-life, whole-life, universal life and second-to-die life insurance policies. We assure the best products. Enjoy our unique and cozy hospitality which no one provides. Try us and save your money.***

**Please call:**

**Y.K. Tamaskar for No Obligation Information**

**Tel: 440-729-8293**

**440-729-8296**

**Fax: 440-729-8296**

**Happy Diwali and Best Wishes From**



**Hira , Harsha , Sony & Ashwin Rane**

**Happy Diwali and Best Wishes From**



**SUNNY'S ASIAN FOOD & SPICES,**
**SOLON, OFF ROUTE 91**




# साठे परिवार

## गुंतता हृदय हे...

आमच्या घराभोवताली पुष्कळ फुलझाडे व फळझाडे आहेत. पहाटे तऱ्हेतऱ्हेचे पक्षी झाडांवर येत असतात व त्यांचा किलबिलाट अखंड चालू असतो. आम्हाला आमच्या खिडकीतून पक्ष्यांच्या हालचाली बघण्याचा छंदच लागला आहे.

असेच एके दिवशी सकाळी न्याहारी करत असतांना बुलबुल पक्षाची एक जोडी आमच्या खिडकी बाहेरच एका जास्वंदीच्या झाडावर एक सारखे येरझारा करतांना दिसली


बुलबुल जोडी


सुबक घरटे

कुतुहल म्हणून मी जास्वंदीच्या झाडांत डोकावून बघितले. तर तेथे त्यांनी फांद्यांच्या बेचकीत एक सुबक घरटे बांधलेले दिसले. तेंव्हा कळले की त्यांची अंडी घालण्याची तयारी चालू आहे.

थोडे दिवस गेले. त्यांची जा ये चालूच होती. बहुतेक घरट्याच्या आत पाला पाचोळा जमा करत होते. काही दिवसांनी मादी घरट्यात बसू लागली. परत जाऊन बघितले तर घरट्यांत तीन गुलाबी रंगाची ठिपके असलेली अंडी होती.


तीन गुलाबी अंडी


जन्मानंतरची पिल्ले

लगेच कावळे व मांजराच्या खेपा चालू झाल्या. आमच्या मनात मात्र पाल चुकचुकली व धोका जाणवला. आम्ही बुलबुल जोडी व त्यांच्या अंडयांच्या संरक्षणाचा जणू वसाच घेतला. अशा तऱ्हेने नकळत आम्ही त्यांच्यांत गुंतत गेलो.

मादी रोज अंडयांवर बसून त्यांना ऊब देत होती व नर बाहेर बसून पहारा देत असे. पंधरा दिवस गेले व एक दिवस घरट्यातून बारीक चिवचिव ऐकू आली. एका अंडयातून चिमुकले पिल्लू बाहेर आले. दोन दिवसांच्या अंतराने सर्व अंडयांतून पिल्ले बाहेर आली. जन्मताच ते मांसाचे गोळे दिसत होते.




कायमची भुकेली

आम्ही जवळ गेलो व हालचालीची चाहूल लागली की लगेच चोच वासून घास घेण्याच्या तयारीतच असायची. बुलबुल जोडगोळीची धावपळ बघण्यासारखीच होती. चोचीतून त्यांना काय काय आणून भरवत होते. गंमत म्हणजे त्यांत दोघांचाही सहभाग होता. हळूहळू पिल्ले मोठी होत होती व त्यांना पंख पण फुटू लागले. एक पिल्लू घरट्याबाहेर येऊन पंख फडफडावयास लागले. तेंव्हा त्याची उडण्याची तयारी चालू झाली होती. दुसऱ्या क्षणी ते भुर्रकन उडून पण गेले.


पिल्लांना भरवताना


पिल्लांची जलद वाढ


छोट्यांची शांत विश्रांती



उडण्याची तयारी

काही दिवसांनी दुसरे पण पिल्लू घरटयाच्या बाहेर आले. तसेच पंख फडफडून उडण्याचा प्रयत्न चालू होता. पण त्याची झेप फक्त छोटया झुडूपांपर्यंतच गेली. त्याचे माता–पिता उडण्याचे धडे देत होते. काही दिवसांनी त्याचीही झेप पेरुच्या झाडापर्यंत गेली. आता तिसऱ्या पिल्लाची पाळी. त्याला मात्र अजून हिंमत होत नव्हती. हे सर्वात छोटे व अशक्त होते. जवळजवळ आठ दिवस ते घरटयाबाहेर डोकावे व परत आत जाऊन बसे. बुलबुल जोडी रोज वेगळेवेगळे आवाज करून त्याच्या उडण्यासाठी प्रयत्न करीत होते. शेवटी हिंमत करून त्याने झेप घेतली पण फार उंच जाऊ शकले नाही. छोटया झुडूपापर्यंतच त्याची उडण्याची मजल होती. अशाच एका प्रयत्नात ते जमिनीवर थकून बसले. तेवढ्यातच तेथे मांजर आले व त्याच्याजवळ जाऊन हुंगू लागले. पिल्लू भीतीने थरथर कापत होते. माता–पिता जीवाच्या आकांताने चिवचिवाट करत होते. त्यांचा आवाज ऐकून मी बाहेर आले. सर्व प्रकार लक्षात आला व मांजराला हाकलले.

आमचा माळी पण तेवढ्यात तेथे आला. त्याने ते पिल्लू उचलून परत घरटयात नेऊन ठेवले. पण पिल्लू घरटयात न बसता बाहेर फांदीवर येऊन बसले व आई–वडीलांना साद घालू लागले. क्षणार्धात बुलबुल जोडी तेथे हजर झाली. मला वाटले की ते त्याला काही भरवतील पण तसे न करता ते त्यांच्या भाषेत त्याला उडण्यास उद्युक्त करत होते. मला दया आली. मी त्याच्यासाठी तीळ व पाणी ठेवले. वाटले थोडे खाल्ले की ताकद येऊन उडून जाईल. पण नवल असे की त्याच्या आईने पंखाने ते तीळ उलटून टाकले. जणू ती त्याला शिक्षा देत होती. व त्याचा परिणाम योग्यच झाला. आपले पंख फडफडून त्याने थेट हवेत झेप घेतली व पेरुच्या झाडावर जाऊन बसले. माझा जीव भांडयात पडला. दुसऱ्या दिवशी सर्व बुलबुल कुटुंब पेरुच्या झाडावर आनंदाने बागडतांना दिसले.

मला हा अनुभव अगदी आगळा वेगळा होता व तो मला आपणा सर्वांना सांगावासा वाटला. म्हणून हे वर्णन लिहून ठेवण्याचा विचार केला. बुलबुल पक्षांची वर्तणूक ही मला आपल्याशी खूपच मिळती–जुळती वाटली. आपण पण आपल्या मुलांना अशाच प्रकारे शिस्त लावण्याचा प्रयत्न करत असतो. आता बुलबुल जोडी व तीनही पिल्ले उडून गेली आहेत. आम्हाला त्यांची सारखी आठवण येते व आमची नजर त्यांना पेरुच्या झाडावर शोधत असते. या सर्व प्रसंगाचा अनुभव आम्ही कॅमेऱ्यात टिपला. ते फोटोही सोबत जोडत आहे.

**–डॉ. सरोज काळे**

## शब्दांचे अर्थ

क्षितीजाचे तट तोडीत
आठवणीतल्या सागरतळाशी
पायथळी तुडवून चुरगळलेल्या काळाचा
गुंता अलगद सोडवित
मन अचानक सोडून पळत
या निर्जिव शरिराला
जसा अर्थ सोडून जावा शब्दांना

इंद्रधनूच्या त्या गावाशी
मंतरलेल्या प्रत्येक पळाशी
विसरलेल्या सगळ्या चेहऱ्यांशी
शाळेच्या भिंतींशी
चिंचेच्या झाडांशी
काकडआरतीच्या सूरांशी
कापसाच्या जिनेच्या धूराशी
संन्यस्त सकाळीशी
धूसर संध्याकाळीशी
मग ते करत एक मूक हितगुज
शब्दांची गरज नसते अर्थाला

**–मिलींद देवगांवकर**







## २१ मोदकांची कृती (२१ मोदक आणि एक करंजी)

### साहित्य:

**सारण:**

ओले खोबरे २ कप
गूळ १ १/२ कप
ब्राऊन साखर १/२ कप
खसखस ४ चमचे, भाजून कुटून घेतलेली
वेलदोडा २ छोटे चमचे
बदाम पूड ४ चमचे
बेदाणे १/३ कप
तांदळाचे पीठ ४ चमचे

**पारी:**

तांदुळाची पिठी ३ कप
पाणी ३ कप
तेल ३ चमचे
मीठ १/४ चमचा (चवीप्रमाणे)

### कृती:

खोबरे, गूळ, साखर एकत्र करून घ्यावे. मंद विस्तवावर शिजवावे. गूळ विरघळल्यावर दहा मिनिटे शिजून द्यावे. नंतर खसखस, वेलदोडा व बदाम पूड आणि बेदाणे घालावेत. सारण तयार झाल्यावर तांदुळाची पिठी पसरून घालावी. सारण ५ मिनिटे शिजवावे. तांदुळाच्या पीठीमुळे सारणास पाणी सुटत नाही.
३ कप पाणी उकळत ठेवावे. त्यात चिमुटभर मीठ आणि ३ चमचे तेल घालावे. उकळत्या पाण्यात ३ कप तांदुळाची पिठी एकदम घालावी आणि ढवळावी.( हळू घातल्यास गुठळ्या होतात). झाकण घालून, मंद आचेवर २ मिनिटे ठेवावी. फूड प्रोसेसर किवा पोट्याटो राइसर वापरून ती अगदी गरम असताना मळून घ्यावी. उकड कोमट झाल्यावर थोडे तेल व थोडे पाणी हाताला लाऊन मळून घ्यावी. जेवढी उकड चांगली मळलेली असेल तेवढी पारी सुबक व गुळगुळीत होते.

छोटया लाडूच्या आकाराचा उकडीचा गोळा घ्यावा. दोन्ही हातांनी जोर लाऊन गुळगुळीत गोळी करावी. हाताला थोडे तेल आणि पाणी लाऊन दोनही आंगठे बोटीच्या मधोमध घालून अंगठा आणि चार बोटांच्या मध्ये फिरवत एकसारख्या जाडीची मधम पुरीच्या आकाराची खोलगट पारी तयार करावी. त्या पारीला सारख्या अंतरावर ८ चुण्या पाडाव्या. त्यात एक चमचा सारण घालावे. चुण्यांच्या वरच्या बाजूला हात न लावता, सारणासकट पारीचा सपाट मध्यभाग डाव्या हाताच्या तळव्यावर ठेवावा. उजव्या हाताच्या अंगठा आणि तर्जनी च्या कडेने सर्व चुण्यांच्या खालचा भाग हलक्या हाताने एकत्र करून फिरवत फिरवत मोदक वळावा. मोदक वळताना डाव्या हाताच्या तळाने वर उचलून घ्यावा. मोदकाची चोच बोटांनी एकत्र करू नये. हाताच्या अंगठा आणि तर्जनी च्या मधल्या तळहाताच्या कडेने हलक्या हाताने फिरवताना मोदकाची चोच आपोआप तयार होते.

मोदक तयार झाल्यावर चाळणीवर ओले फडके घालून त्यात अलगद चोच मोडत नाही अशी काळजी घेऊन झाकण ठेवावे. मोदक एकावर एक ठेवू नयेत. ते २० मिनिटे वाफेवर उकडावेत. गरम असतानाच काढून बशीत ठेवावे.

**-डॉ. आशा प्रतिनिधि**

**NEOMM गणेश सोहळा ९.२२.२०१२**

## मदत

पांडोबा रागारागातच घरात शिरला. दरवाजा जोरात आपटून बंद केला आणि बायको-मुलांवर डाफरून आतल्या खोलीत खाटेवर पडला. संतापाने लालेलाल झालेल्या पांडोबाची छाती भात्याप्रमाणे उसासत होती. "दादा बोलले का काही?" बायकोने काळजीने विचारलं. पांडोबाने काही न बोलताच कूस बदलली.

दादा देवास्करांबरोबर झालेला वाद परत बायकोसमोर उगाळून त्याला अजून डोकं तापवायचं नव्हतं. वास्तविक चुक पांडोबाचीच होती. दादा देवासकर म्हणजे गावातील एक नामी असामी. देवास्करांच्या पिढ्यानपिढ्या गावातच वाढलेल्या. दादा आणि वैनी देवासकर गावातल्या सर्वांचेच दादा आणि वैनी होते. कधीही कुणाला काहीही गरज पडली कि पहिली धाव दादा-वैनीकडे ठरलेली.  दादांकडे मदत मागायला आलेला माणूस कधीच रिक्त हस्ताने परत गेला नव्हता. अश्या मातब्बर दादांना  पांडोबाकडे मदत मागायची पाळी आली होती.

झालं असं होतं...दादांनी ह्यावर्षी सत्यनारायणाची पूजा करायचा घाट घातला होता. रीतीप्रमाणे सर्व गावाला आमंत्रणेही गेली होती.  पण पूजेला महिना राहिलेला असतानाच बातमी आली होती कि सरपंचाना गेल्या तीन वर्षांपासून जो तमाशाचा फड गावात आणायचा होता त्यांनी अचानक गावाचा दौरा करायचा बेत केला होता. मुख्य म्हणजे तमाश्याच्या फडाचा  पहिला दिवस आणि पूजेचा दिवस नेमका एकच  होता. एरवी दादांच्या घरचं कार्य म्हटले कि गावातले सर्व आपल्या घरचंच कार्य असल्यासारखे काम करायचे. पण ह्यावेळी नसता घोळ झाला होता.  सरपंचानी गावाच्या इभ्रतीचे कारण सांगून  आधीच बऱ्याच लोकांना कामासाठी कबूल करून घेतलं होतं. दादांना ऐनवेळी मदतीसाठी कोणीच मिळेना.  अश्यावेळी दादांना पांडोबाची आठवण होणं स्वाभाविक  होतं. पांडोबाने दादांकडून वेळोवेळी मदत घेतली होती. अगदी पांडोबांच्या मोठ्या मुलीचं लग्नही दादांच्याच घराच्या परसातील  मांडवात झालं होतं.  एरवी सर्वांना मदत करणाऱ्या दादांना पांडोबाकडे मदत मागायला तसं जड वाटत होतं पण अडला नारायण म्हटल्यावर इलाज नव्हता. पांडोबानेही दादांनी आपल्याला विचारलं ह्याच आनंदात पटकन होकार देऊन टाकला होता.

पण जसा जसा पूजेचा दिवस जवळ येऊ लागला तशी तशी पांडोबाला चुटपूट लागू लागली.  त्याचे सर्व मित्र तमाश्याच्या कामात गुंतले होते. शिवाय पूजेच्या दिवशी पूजेनंतर गावातली सर्वच मातब्बर मंडळी तमाश्याला जाणार होती. पांडोबाला मात्र पूजेनंतर मागचं सर्व आवरत दादांकडेच थांबावं लागणार होतं. पांडोबाला काय करावं सुचेना. तमाश्याचा मोह आणि गावातल्या मोठ्या मंडळींच्या मांडीला मांडी लाऊन बसायचा योग पांडोबाला तमाश्याकडे खेचत होते. शेवटी पूजेच्या आदल्या रात्रीच पांडोबा खळ्यात लपून बसला. बोलवायला  आलेल्या दादांच्या माणसांना पांडोबाच्या बायकोने खोटे नाटे सांगून परत  धाडले. अख्खा पूजेचा दिवस लपून काढून पांडोबा  संध्याकाळी परस्पर तमाश्याच्या फडावर पोचला. दादांच्या नशिबाने मदतीला ऐनवेळी इतर लोक उभे राहिले आणि पूजा यथासांग पार पडली. दुसऱ्या दिवशी पांडोबाला तमाशा बघून बाहेर पडताना  पाहिल्याचे तात्या खोतानी दादांना सांगितले आणि दादा भडकले. पांडोबाला घरी बोलावून चांगला जाब विचारला. गुमान ऐकायचे सोडून पांडोबा उगाच हुज्जत घालू लागला आणि शब्दाला शब्द वाढून वाद वाढला.

आता दादा आपल्याला काय करतील ह्या भीतीने पांडोबाची गाळण उडाली होती. घरी येऊन खाटेवर पडला आणि डोळा लागला. पण थोड्याच वेळात छातीत दुखायला लागलं. घाम आला आणि तोंडातून शब्द फुटायच्या आधीच पांडोबाचा आत्मा शरीरातून बाहेर पडून तरंगत ढगाकडे जाऊ लागला. म्हणता म्हणता पांडोबा यमलोकी पोचला. तेथल्या दरवानाने पांडोबाला "पाप पुण्य हिशोब कचेरी"चा रस्ता दाखवला. तेथल्या कारकुनाने आपल्या वहीत बराच वेळ डोके घालून मग पांडोबाला "चित्रगुप्त" असे सोनेरी अक्षरात लिहिलेल्या कचेरीबाहेर उभे केले. थोड्याच वेळात चित्रगुप्त स्वतःच कचेरीबाहेर आला. "पांडोबा, चला" असे म्हणून सरळ चालू लागला. पांडोबाला एका मोठ्या द्वाराबाहेर आणून चित्रगुप्त म्हणाला "पांडोबा, विचित्र गोष्ट घडली आहे. तुझे पाप आणि पुण्य सारखेच आहे आहे त्यामुळे स्वर्गात जायचे कि नरकात हे आम्हाला ठरवता येत नाही. दोन्ही ठिकाणे पाहून मग तो निर्णय तुझा तूच घ्यायचाय". पांडोबा हे ऐकून खुश झाला. चित्रगुप्ताने द्वार उघडले. आत सुंदर बगीचा, अनेक प्रकारची फुले, पक्षी, झरे पाहून पांडोबा मोहून गेला. समोरच एक सोन्याचा प्रासाद होता. त्या दिशेने पांडोबा आणि चित्रगुप्त चालत असतानाच जोरात घंटानाद ऐकू आला. "जेवणाची वेळ झाली वाटते" चित्रगुप्त म्हणाला. प्रासादाच्या भोजनकक्षात पांडोबा आणि चित्रगुप्त शिरताच त्यांना अनेक पक्वान्नांचा दरवळणारा सुवास आला. "वा, हा स्वर्ग किती छान आहे" पांडोबा उद्गारला. चित्रगुप्त गालातच हसला.

एवढ्यात मोठ्या झुंडीने अनेक लोक भोजनकक्षात शिरले आणि जेवायला बसले. प्रत्येकाच्या समोर अनेक पक्वान्नानी भरलेले ताट होते. पण विचित्र गोष्ट अशी कि त्यांच्या प्रत्येक हाताला दोन फुट लांबीचा एक एक चमचा लावला होता. सगळे त्या चमच्याने समोरच्या ताटातले जेवायचा खूप प्रयत्न करत होते पण दोन फुटी चमचा असल्यामुळे चमच्यात घेतलेले ओठांपर्यंत पोचत नव्हते. अर्धा एक तास अशीच झटापट चालू राहिली आणि थोड्याच वेळात जेवणाची वेळ संपल्याचा घंटानाद ऐकू आला. उपाशी अर्धपोटी सगळे जण परत गेले. "हा नरक आहे" चित्रगुप्त म्हणाला आणि थोड्याच वेळात पांडोबाला अजून एका द्वाराकडे घेऊन आला. द्वार उघडताच आत आधीचाच देखावा होता. तसाच सुंदर बगीचा, अनेक प्रकारची फुले, पक्षी, झरे पाहून पांडोबा गोंधळून गेला. इथेही समोर एक सोन्याचा प्रासाद होता. त्या दिशेने पांडोबा आणि चित्रगुप्त चालत असताना परत आधीसारखाच जोरात घंटानाद ऐकू आला. प्रासादाच्या भोजनकक्षात पांडोबा आणि चित्रगुप्त शिरताच त्यांना परत त्याच पक्वान्नांचा दरवळणारा सुवास आला. इथेही आलेल्या लोकांच्या हाताला तसेच दोन फुटी चमचे होते. "हा स्वर्ग नरका प्रमाणेच कसा?" हा प्रश्न पांडोबाच्या डोक्यात थैमान घालू लागला. तेवढ्यात सर्वांनी जेवायला सुरुवात केली. जेवायला बसताच प्रत्येक जण आपल्या ताटातील पदार्थ समोर बसलेल्या माणसाला भरवू लागला. त्यामुळे दोन फुटी चमचे असूनही सर्वजण अगदी मजेत पोटभरून जेवले आणि हसत हसत थट्टामस्करी करत परत गेले.

"पाहिलेस पांडोबा. अरे, स्वर्ग आणि नरक काय

सुविधांनी बनत नाही. आपणच आपल्या कर्मानी बनवतो. नरकातले लोक स्वार्थी भावनेने आपल्याच पोटाचा विचार करत बसले आणि दुख्खी होऊन परत गेले. तर स्वर्गातल्या लोकांनी दुसर्याला मदत करून आपलेही पोट भरले आणि  समोरच्याचेही.  स्वर्ग मिळवण्यासाठी काय मरायची गरज नाही. तुम्ही आहात तिथेच स्वर्ग निर्माण करू शकता." चित्रगुप्त पांडोबाला सांगू लागला.  पांडोबा म्हणाला "देवा, तुला सांगायला काय जातंय? खाली पृथ्वीवर येऊन बघ. इथे मदत करायला येणार्यांचा पूर्ण फायदा घेतात  पण परत मदत करायला कोण येत नाही".

"म्हणजे तू दादांबरोबर केलस तसे?" चित्रगुप्त थोड्या करड्या स्वरात म्हणाला. पांडोबाने मान  खाली घातली. चित्रगुप्त म्हणाला " पांडोबा, अरे तुझ्या सारख्या माणसांमुळेच लोक हल्ली कोणाला मदत करत नाहीत. एकोप्याने रहात नाहीत. अरे, माणसाने पावसासारखं असावे. सतत वृष्टी करत रहावी. जमीन सुपीक असेल तर धान्य पिकते, आणि दगड असेल तर पाणी फुकट जाते पण म्हणून पाउस काही आपली वृष्टी कमीजास्त करत नाही. त्याचे कार्य तो करतो. आपण मात्र सुपीक जमीन व्हायचे  कि दगडासारखं वागायचं हे आपलं आपण ठरवायचं".  पांडोबा खजील झाला.  तेवढ्यात "महोदय, महोदय" असे ओरडत चित्रगुप्ताच्या कचेरीमधला कारकून धावत आला. "चूक सापडली. पांडोबाने दादांचा केलेला घात आपण  हिशोबात धरला नव्हता. आता ह्याच्या हिशेबात पाप अधिक आहे. ह्याला नरकात धाडायचे आहे" कारकून धापा टाकीत म्हणाला.

"नको नको" म्हणत पांडोबा उलटा पळत सुटला. मागे चित्रगुप्ताचे सेवक पळू लागले. पांडोबाच्या  खांद्यावर एक हात पडला. "नाही नाही...सोडा  मला...जाउ  द्या मला" पांडोबा ओरडू लागला. "अहो, काय झालं?" एक बायकी आवाज ऐकू आला. पांडोबाने वळून पाहिले तर त्याची बायको त्याच्या घामाने चिंब भिजलेल्या सद्र्याला धरून काळजीने पांडोबाकडे बघत होती. "अहो, झोपेत ओरडताय कश्याला?" पाठीत एक दणका देत पांडोबाच्या बायकोने विचारलं. पांडोबा भानावर आला. खाटेवर कूस बदलली. "हे सर्व स्वप्नच होते तर?" मनातच पांडोबा म्हणाला आणि  उद्याच जाऊन दादांची माफी मागायची अशी मनाशी खुणगाठ बांधत परत गाढ झोपी गेला.

-- जय मसुरेकर



**Girl's Night Out – October 2012**

## टेनिसला वेढा फितुरीचा

ऑलिम्पिक म्हणजे क्रीडाक्षेत्रातल्या सर्वोत्तमाचा सोहळा. या महाकार्याची लगबग आता जाणवू लागली आहे.... हॉकी असो अथवा नेमबाजी- प्रत्येक खेळाडूचा, संघाचा कसून सराव सुरू आहे... जगातल्या मातब्बर खेळाडूंना टक्कर देण्यासाठी खेळाडू, त्यांचे प्रशिक्षक, सपोर्ट स्टाफ यांची घाई उडाली आहे. खुप वर्षानंतर भारताचे अनेक खेळाडू पदकाच्या शर्यतीत आहेत... पन्नासहून अधिक खेळाडू लंडनवारी करणार आहेत... काश्मीरपासून कन्याकुमारी आणि कच्छ पासून मेघालय पर्यंत अखंड पसरलेल्या भारताचे आपण प्रतिनिधीत्त्व करणार आहोत याचा त्यांना सार्थ अभिमान आहे मात्र आपली स्पर्धा जगातल्या अव्वल खेळाडूंशी असल्याची त्यांना जाणीव आहे... या सगळ्या सकारात्मक चित्राला टेनिस संघाच्या निवडीच्या अनागोंदीने गालबोट लावले आहे.

ऑलिम्पिकमध्ये टेनिस या खेळासाठी पात्रता स्पर्धा नाही. डब्ल्यूटीए आणि एटीपी या संघटनांनी एका विशिष्ट दिवशी जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार खेळाडूंचा ऑलिम्पिक सहभाग निश्चित होतो. क्रमवारीत सातवे स्थान राखत भारताचा बुजुर्ग खेळाडू लिएण्डर पेस ऑलिम्पिकसाठी थेट पात्र ठरला. महेश भूपती आणि रोहन एकत्रित केले तर ते ऑलिम्पिकसाठी पात्र ठरत होते. टेनिसपेक्षा आपला पोशाख, लग्न, वक्तव्य यामुळे चर्चेत राहणा-या सानिया मिर्झा क्रमवारीत बाराव्या स्थानी फेकली गेल्यामुळे ती थेट पात्र ठरु शकली नाही. वाइल्ड कार्डद्वारे म्हणजे मागच्या दाराने तिला ऑलिम्पिक प्रवेश मिळू शकतो.

आयटा अर्थात अखिल भारतीय टेनिस संघटनेने लिएण्डर पेस-महेश भूपती या जोडीचे नाव लंडनसाठी निश्चित केले आणि वादाचा भडका उडाला. पेस-भूपती म्हणजे भारतीय टेनिसविश्वाचा चेहरा आहेत, आयकॉन आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर टेनिसमध्ये भारताला सन्मान मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण काम या जोडीने आपल्या दमदार प्रदर्शनाच्या माध्यमातून केले आहे. मात्र आपापसातले मतभेद मिटवण्यात त्यांना यश मिळालेलं नाही. एकमेकांचा खेळ समजून घेत पूरक खेळ करण्याचे धोरण, जबरदस्त फिटनेस, सातत्यपूर्ण कामगिरी यामुळे जागतिक स्तरावरच्या नामांकित जोड्यांमध्ये पेस-भूपती जोडीचे नाव आजही घेतले जाते. काही वर्ष एकत्र खेळल्यानंतर त्यांच्यामध्ये जे काही मतभेद झाले ते संपुष्टात आणायला कोणालंच जमलेले नाही. देशासाठी तर कधी पदकासाठी ते एकत्र यायचे, पुन्हा विलग व्हायचे, हे चित्र नेहमीचे.

यावेळी मात्र या सगळ्याचा कडेलोट झाला आणि संपूर्ण जगासमोर आपलं हसं झालं. पेसबरोबर खेळायला भूपतीने नकार दिला. “ऑलिम्पिकला समोर ठेवूनच मी बोपण्णासह खेळायचा निर्णय घेतला. याची टेनिस संघटनेला कल्पना होती. त्यांनी आम्हाला प्रोत्साहनही दिले. आता मात्र त्यांनी मला पेससह खेळण्याचा पर्याय समोर ठेवला” असे भूपतीने पत्रात म्हटलं. “विश्वासघात करणा-या पेसचं मी तोंडही पाहू शकत नाही” असे सांगत संघटनेचा निर्णय मान्य करण्यासच भूपतीने नकार दिला. वैयक्तिक मतभेद काहीही असोत, परंतु ऑलिम्पिकसारख्या मेगा इव्हेंटमध्ये देशाचे प्रतिनिधीत्त्व करण्याची संधी समोर आहे मात्र भूपतीने ती नाकारली. “मला बोपण्णासह पाठवा” हा आग्रहही त्याने कायम ठेवला.

संघटनेपेक्षा एखादा व्यक्ती मोठा असू नये असे

सर्वसाधारण तत्त्व आहे. इथे तर त्याची उघडउघड पायमल्ली होताना दिसली. संघटनेने विनंती, विनवण्या करुनही भूपती पेससह खेळायला तयार झाला नाही. हा ऐकत नाही म्हटल्यावर हाच सगळा पाढा बोपण्णापुढे वाचण्यात आला. मात्र त्यानेही भूपतीचा कित्ता गिरवला आणि पेसला नकार दिला. ऑलिम्पिकमध्ये खेळायची संधी हुकली तर खेळाडूंना अश्रू आवरत नाहीत, कारण जगासमोर आपले कौशल्य पेश करण्याचे ते व्यासपीठ असते, तो एक मान असतो. पण या सगळ्याचा भूपती-बोपण्णाला संपूर्णपणे विसर पडला. पेस एकाकी पडला... चॅनेलवर उलटसुलट पॅनेल डिस्कशन झाले... आरोप-प्रत्यारोप झाले... जोडी म्हणून पाठवणार नसाल तर आम्ही लंडनला जाणार नाही असा आग्रह भूपती-बोपण्णा जोडीने केला. तुमच्यावर कारवाई करू असा बडगा संघटनेने दाखवला मात्र त्यानेही काहीही परिणाम झाला नाही. पेसला साथ देण्यासाठी सोमदेव देववर्मन, युकी भांब्री, विष्णु वर्धन यांची नावे समोर आली. यापैकी सोमदेव दुखापतीमुळे सहा महिने कुठल्याही प्रकारचे टेनिस खेळलेला नाही. यापेक्षा नाट्य पुढेच घडले. एकोणीस वर्षाच्या युकी भांब्रीने पेससह खेळण्यास नकार दिला. यानंतर संघटनेचे धाबे दणाणले.

ऑलिम्पिकसाठी दोन टीम पाठवण्याची तरतुद असताना एकच संघ पाठवण्याचा अट्टाहास का असा सवाल खुद्द क्रीडामंत्री अजय माकेन यांनी केला. पेसबरोबर खेळायला तीन खेळाडू नकार देतात यामागचं कारण काय असेल याचा विचार संघटनेने केलाच नाही. प्रत्येक खेळासाठी विशिष्ट संघटना कार्यरत असते. कुठलीही आंतरराष्ट्रीय स्पर्धा, त्यातील सहभाग, नियम यासाठी संघटनेच्या मार्फतच खेळाडूचा सहभाग पक्का होतो. निर्णयाच्या बाबतीत संघटनेचा शब्द शेवटचा असतो. असं असताना एकामागोमाग एक तीन खेळाडू संघटनेच्या निर्णयाला जुमानत कसे नाहीत हा प्रश्न ऐरणीवर येतो. कारवाईचा इशारा देऊनही ते बधत नाहीत याचाच अर्थ संघटना कमकुवत आहे किंवा संघटनेच्या निर्णयाचा आदर करावा असं संघटनेने काहीही केलं नाही हे स्पष्ट होतं. या अंतर्गत गोंधळापेक्षाही आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली किती बेअब्रू होते आहे याचा विचार ना संघटनेने केला ना खेळाडूंनी. बाकी देशांचे खेळाडू निश्चित होऊन, त्यांचा सराव दणक्यात सुरू आहे, त्यांचे डावपेच तयार होताहेत, मुख्य सरावाबरोबर ते दोन ते तीन तास जिममध्ये जात आहेत. वजन कसं नियंत्रणात राहील यावर काम चालू आहे आणि आपल्याकडे दोषारोप, मेला-मेली ( भांडणाचा नवीन प्रकार- ई-भांडण म्हणूया) स्टेटमेंट, काउंटर-स्टेटमेंट असा फुल्ल ड्रामा सुरू होता. ऑलिम्पिक जाऊ दे पण तुम्ही तमाशा थांबवा असं वातावरण आहे एकंदरीत. ... हे सगळं कमी पडलं की काय म्हणून या प्रकरणात तुलनेने शांत असलेल्या पेसने तोंड उघडले. "भूपती-बोपण्णा यापैकी कोणा एकाबरोबर खेळायला मी तयार आहे. ते उपलब्ध नसतील तर क्रमवारीत त्यांच्यानंतरच्या खेळाडूसह खेळायला मी तयार आहे मात्र माझ्यापेक्षा खुपच कमी म्हणजे आसपासही नसणा-या खेळाडूबरोबर मी खेळणार नाही.... त्यापेक्षाही मी लंडनवारीच रद्द करीन" अशी धमकीच साहेबांनी देऊन टाकली. पेसला नवखा साथीदार नको, भूपती-बोपण्णाला जोडी नसेल तर लंडन नको आणि सानियाचं वाइल्ड कार्डाच अजून नक्की नाही... म्हणजे चार आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू देशाकडे असतानाही ऑलिम्पिकमध्ये आपलं कुणीच खेळणार नाही अशी परिस्थिती निर्माण झाली. देश, तिरंगा, भारतमाता, हे भारतीय नागरिकाला अगदी आतापर्यंत गहिवरुन टाकणारे शब्द या खेळाडूंसाठी किती शुष्क, बोथट बनलेत हे जाणवलं. खेळांमध्ये येणारं क्लब-फ्रँचाइजी फॉरमॅट हळूहळू देशासाठी खेळायला परावृत्त करेल अशी शंकाही मनात येऊन गेली.

याबरोबर आणखी एका प्रश्नाने मनात घर केलं. पेस-भूपतीचं वय आहे- सदतीस, पस्तीस म्हणजे खेळाडूच्या दृष्टीने कारकीर्दीची संध्याकाळ. युकी काय किंवा

सोमदेव काय किंवा विष्णु काय यांचं वय काय तर- एकोणीस, वीस. या मुलांची आता कुठे टेनिसला सुरुवात झालेय... दुस-या बाजूने बघितलं तर पेस-भूपती नंतर किती मोठा व्हॅक्युम आहे... पोकळी नव्हे अख्खं भगदाडच आहे... मागे वळून पाहायला कोणी नाही... सदतीस वर्षाच्या पेसच्या बरोबर एकोणीस वर्षाचा मुलगा... म्हणजे इतक्या वर्षात या दोन टोकांतली दरी भरून काढेल असा खेळाडू भारताला तयार करता आलेला नाही... आता हा टेनिस संघटनेचा दोष म्हणायचा का ? का गल्लीपासून दिल्लीपर्यंत सर्वव्यापी क्रिकेटला प्राधान्य देऊन आपल्या मुलाला टेनिसपासून लांब ठेवणा-या पालकांना? का आपल्या पायाभूत व्यवस्थेचा? खेळायचं म्हटलं तर मुलांना पुरेशी कोर्ट्स उपलब्ध नाहीत... ज्या ठिकाणी उपलब्ध आहेत तिथे सर्वसामान्यांना जाता येईलच असं नाही.... मग कसा मिळेल आपल्याला ऑलिम्पिक पात्रतेचा टेनिसपटू? ऑलिम्पिकसाठी भारतीय टेनिस संघनिवडीच्या निमित्ताने खुप सारी कटू सत्य बाहेर आली आहेत.... गुरुवारी संघटनेने पुन्हा बैठक घेतली... एक टीम पाठवण्याचा हट्ट संघटनेने सोडला आहे.... म्हणजे पुन्हा व्यक्ती मोठा ठरलाय संस्थेसमोर. भूपती-बोपण्णा एक जोडी तर पेस-विष्णु वर्धन दुसरी जोडी. विष्णु दोन वर्ष पेसबरोबर डेव्हिस कपमध्ये पेसबरोबर खेळलाय पण अनुभवाच्या बाबतीत पेसच्या तुलनेत तो बच्चाच आहे. भूपती-बोपण्णाचा एकप्रकारे विजय झाल्याने पेसने पुन्हा बंड केले . "सानियाबरोबर मिश्र दुहेरीत खेळण्याचे लेखी आश्वासन मिळाले नाही तर ऑलिम्पिकमधून माघार घेईन" अशी भूमिका पेसने घेतली. सानियाला सुदैवाने वाइल्ड कार्ड मिळाला तर मिश्र दुहेरीत पेस तिच्याबरोबर खेळेल असं संघटनेनं जाहीर केलं आणि साहेब तयार झाले. हे सगळंही काही अंतिम नाही... अजूनही कोणी फुरंगटू शकतं, त्याची मनधरणी करावी लागू शकते....

ग्लोबलायझेशनच्या इम्पॅक्टमुळे जरा काही खुट्ट झालं तरी जगभर पोहचतं. आणि आपण करतोय हा ड्रामा संपूर्ण जग पाहणार आहे... याचा विचार बहुतेक त्यांनी केलेला नाही... मुळातच एवढं सगळं रामायण घडून गेल्यावर खेळण्याच्या मनस्थितीत कोणी असणार आहे का ? याचा विचार करण्याची वेळ आली आहे. एक साधं उदाहरण- प्रत्येक घरात भांडणं असतात. वडलांचं मुलाशी पटत नाही, सासुचं सुनेशी पटत नाही... नणंद-भावजयांचं पटत नाही.. ही जनरीत आहे मात्र सणासुदीला... अडल्यानडल्याच्या वेळी.... आपण एक होतो. आपल्या कुटुंबावर काही संकट आलं तर त्यावेळी आपण आपली एकी सिद्ध करत त्या संकटाला भिरकावून देतो. हे सगळं पेस-भूपती-बोपण्णालाही लागू होईल असं वाटलं होतं. इथे मुद्दा ऑलिम्पिकचा होता.... देशहिताचा विचार करून वैयक्तित आकस, मतभेद बाजूला ठेवता आले असते....ऑलिम्पिक डोळ्यासमोर ठेवून प्रत्येक क्रीडापटूसाठी सरकारने ठराविक रक्कम सरावाकरता, प्रशिक्षणावर, क्रीडासाहित्याकरता खर्च केली ....त्याला तरी जागायला हवं होतं.... या भौतिक गोष्टींपेक्षाही ज्यांच्यासाठी हा अट्टाहास केला जातो त्या टेनिसरसिकांसाठी तरी एकोपा करायला हवा होता... मात्र तसं झालं नाही... फंदफितुरीने अनर्थ झाला.... या सगळ्यातून लंडनमध्ये काही सकारात्मक हाती आलं तर ते आपलं संचित म्हणायला हवं!

**–पराग फाटक (स्नेहल बापटच्या द्वारे)**

उपसंहार– ऑलिम्पिक पदकांच्या शर्यतीत भारतीय टेनिस टीम ह्यावर्षी असफल ठरली.

## *चंदेरी दुनिया*

### देव आणि गाईड

३ डिसेंबर २०११ उजाडता उजाडता देवआनंदच्या निधनाची बातमी वाचली, मन फारच सुन्न झालं.

रामदास स्वामींनी "मरावे परी किर्तीरुपे उरावे" ही जी काही उक्ति लिहिली आहे, ती कदाचित देव, राज आणि दिलीप ह्या सारख्यांना तर पाहून लिहिली नाही ना? असा विचार मनात आला. खरंच काही माणसे अशी असतात की जी कधीच विसरता येत नाहीत आणि येणार पण नाहीत. त्यांच्या म्रुत्यु नंतर सुध्दा भा.रा. तांब्यांचे "जन पळभर म्हणतील हाय हाय" हे गाणे ऐकताना त्यांचीच आठवण येते.

देव, राज हे असेच होते. योगायोग म्हणजे राजच्या म्रुत्यूनंतर बरोबर २३ वर्षे आणि सहा महिन्यांनी देवचा म्रुत्यू झाला.

प्रत्येकाचा स्वतःचा एक मास्टरपीस असतो– जसा रणजित देसाईंचा 'स्वामी', शिवाजी सावंतांचा 'म्रुत्यूंजय', तसाच राजचा 'मेरा नाम जोकर' आणि देवचा 'गाईड'. योगायोग म्हणजे राजचा हा मास्टरपीस आपटला, आणि त्याच बालंट देव वर आलं की देवने आपला ' जॉनी मेरा नाम' गाजावा म्हणून राजचा जोकर पाडला.

मी लहान असताना ऐकलेली गोष्ट अशी की 'जोकर' हा तेव्हा महाराष्ट्राचे गौरवस्थान असलेल्या मिनर्व्हा थिएटरला लागला होता, म्हणजे ७० एम.एम.च्या स्क्रीनवर कारण राजचं सर्वच भव्य होतं. अगदी 'आवारा' मधील सरकारी न्यायाधिश असलेल्या प्रुथ्वीराज कपूरचं घर सुध्दा. तरीही अप्सरातील ३५एम.एम. वरचा देवचा 'जॉनी मेरा नाम' कसा गाजला? कुणी म्हणत की देवने मिनर्व्हातील एका महीन्याची 'जोकर'ची सर्व तिकिटे आधीच विकत घेतली होती. पण तरी फरक काय पडला? चांगली कलाकृती कधीही चालते. मग देवचा मास्टरपीस राज का नाही पाडू शकला? काय राज कडे दुसरी कलाकृती नव्हती तेव्हा? का राज हया खेळाशी देव खेळेपर्यंत परिचित नव्हता? आणि 'जॉनी मेरा नाम' तर १९७० चा आणि 'जोकर' १९७२ चा –मग देव कसा पाडणार?

'जोकर' विषयी किंवा इतर काही गोष्टींविषयी मला चर्चाकरायची नाही आहे. परंतु तरी इकडे एक नमूद करावसं वाटतं की जर हा पिक्चर विजय आनंद ऐवजी चेतन आनंदने दिग्दर्शित केला असता तर नक्की आपटला असता, कारण चेतन आनंदचा वीक पॉईंट ही प्रिया राजवंश होती आणि जेव्हा देव पहिल्यांदा त्याच्याकडे गेला तेंव्हा त्याने हीच अट घातली होती की प्रियाला जर हिरॉईन करणार असशील तरच हा चित्रपट करीन. परंतु देवला वहीदा हवी होती आणि व्यावसायिकपणे देवचं बरोबर होतं हे चित्रपट पहाताना लक्षात येतं, कारण वहीदा एवढी प्रिया ही निश्चीतच उत्तम अभिनेत्री किंवा न्रुत्यांगना सुध्द्वा नव्हती. इकडे आणखी एक नमूद करावसं वाटतं की तेव्हा वहीदाने सुध्दा देवला अट घातली होती की माझे इतर कुठलेही सीन कापले तरी चालतील परंतु नृत्याचा एकही सीन कट होता कामा नये आणि तो झाला नाही कारण प्रत्येक नृत्याच्या सीनमध्ये तिच्या बरोबर देव हा होताच.

हया पिक्चरच्या यशामागचे कारण म्हणजे विजय आनंदचं दिग्दर्शन आणि सचिनदांचं संगीत. सचीनदांनी संगीत द्यावं म्हणून देव तीन महिने पिक्चर करायचा थांबला कारण सचिनदा हे आजारी होते. त्यांनी स्वतः देवला सांगितलं होतं की तू दुसरा संगीतकार बघ म्हणून. परंतु देवने सांगितलं की ह्या पिक्चरचं संगीत दिग्दर्शन करणार तर तुम्हीच मग मला कितीही जरी थांबावं लागलं तरी चालेल. टीमवर्कचा हा उत्कृष्ट नमुना वाटत नाही का? विश्वास जो महत्वाचा असतो टीमवर्क मध्ये तो इथेच होता आणि भावनिक लागेबांधे आणि प्रेक्षकांची नाडी ओळखणे आवश्यक होते. तेव्हाचा प्रेक्षक हा जागरुक होता आणि त्याच्या चोखंदळपणाची जाणीव बॉलीवूडला होती हे सुध्दा मी नमूद करीन.

वास्तविक गाईड ही कादंबरी आर. के. नारायण हयांनी लिहिलेली, त्यात निश्चितच दक्षिण भारताचा उल्लेख असणारच नव्हे तर होताच, प्रथम शूटिंग सुध्दा तिरुपती येथेच पार पडलं होत. परंतु गाडी अडली ती 'तेरे मेरे सपने अब एक रंग है' ह्या गाण्याच्या वेळी. विजय आनंदला ह्या गाण्याला

साजेसा सीन मिळेना, शेवटी एक सीन विजय आनंदला आठवला तो म्हणजे 'हकिगत' चित्रपटात काम करताना उदयपूर जवळ. परंतु गाईड हा पिक्चर दक्षिणेला चित्रीत केलेला आणि एका गाण्यासाठी फक्त उत्तरेस जाणे हे विजयला पटेना , कारण त्याच्या मते पिक्चरचा सगळा सिक्वेन्स निघून जाईल.

सरते शेवटी गाईड हा सगळा उदयपूरला चित्रीत करायचा ठरले, चित्रपटाची पूर्वीची चार रिळं अक्षरशः जाळण्यात आली, आणि पुनः पहिल्या पासून उदयपूर येथे शूटिंग सुरु झाले. परंतु पुन्हा गाडी अडखळली 'तेरे मेरे सपने अब एक रंग है' च्याच वेळी, कारण मूळ गाणे हे २० मिनीटांचे असुन त्या गाण्याला साजेसा सीन फक्त १५ मिनीटांचा होता. विजय आनंदने सचिनदांना विनंती केली गाणे छोटे करायला, सचिनदांनी सुध्दा काहीही किंतु न ठेवता गाणे पुनः रफ़ीच्या आवाजात डब केले. त्यानंतर ह्या गाण्याची त्याच सीन वर तीन पायलट शूटिंग सुरु झाली, आणि शेवटी हे गाणे खऱ्या अर्थाने चित्रीत झाले. हे गाणे पडद्यावर पहाताना एक जाणवेल की हे गाणे संपल्यावर देव जेव्हा वहीदाच्या खांद्यावर हात ठेवतो तेव्हा आपल्या हातातील घडयाळाकडे पाहून सुटकेचा निःश्वास सोडतो.

टीमवर्क चांगले झाल्यामुळेच गाईड हा फार गाजला, आणि हया वरुन कळेल की त्यावेळचे कलाकार, दिग्दर्शक हे प्रेक्षकांच्या नाडीबद्दल किती चोख होते, आणि कला हा धंदा नसून एक व्यवसाय होता मनोरंजनाचा. तेव्हाचा प्रेक्षक सुध्दा फारच चोखंदळ होता, आणि त्यामुळेच दक्षिणेचे शूटिंग उत्तरेत करण्यात आले.

आजकालच्या जगात कुठलाही मालमसाला चालतो. शूटिंग भारतात आणि एक गाणं चित्रीत कॅनडात, दुसरे अमेरिकेत, तिसरे फ्रांसमधे, चौथे स्पेन तर पाचवे लंडनमधे, काय मूर्खपणा आहे हा.

'ईव्हिनिंग इन पेरिस' किंवा 'लव इन टोकियो' सारख्या चित्रपटात सुध्दा विदेशात गाणी दाखवली परंतु सर्व चित्रिकरण सुध्दा विदेशातच होतं.

**–विलास देसाई**

## पर्यावरणचळवळीची गीता– 'सायलेंट स्प्रिंग'

सागरी जीवशास्त्रज्ञ रॅचेल कार्सन यांनी १९६२ साली लिहिलेल्या 'सायलेंट स्प्रिंग'या पुस्तकाला या वर्षी ५० वर्षे पूर्ण झाली.अमेरिकेबरोबरच संपूर्ण जगाला खळबळजनक धक्का देणाऱ्या या पर्यावरणचळवळीच्या गीतेच्या ५०व्या स्मृतिवर्षानिमित्त अंजू जोशी यांनी हे पुस्तक मराठी वाचकाला उपलब्ध केलं आहे.'लोकवाङमय गृह प्रकाशन' तर्फे 'सायलेंट स्प्रिंग' ह्या पुस्तकाचं मराठीतल स्वैर रुपांतर डिसेंबर २०१२ मध्ये प्रकाशित होत आहे.

"डी डी टी व त्यासारख्या इतर कृत्रिम रसायनांच्या होणाऱ्या भयानक जीवशास्त्रीय व पर्यावरणीय परिणामांच विश्लेषण व त्यासंबधात होऊ शकणारी उपाययोजना " ही या पुस्तकाची मध्यवर्ती कल्पना आहे. निसर्ग आणि माणूस यांच्यामधलं अद्वैत म्हणजे 'पर्यावरणातला सारासार विवेक'. या विवेकाचा समतोल बिघडल्यामुळे होणाऱ्या पर्यावरणविनाशाचे परिणाम सर्वस्पर्शी व दूरगामी असतात.

कृत्रिम रसायनांच्याच उत्पादनाचा आग्रह धरणाऱ्या, त्यासाठी कुठल्याही थराला जाउन सत्तास्थानी असणाऱ्या राजकीय शक्तिंना आपल्या खिशांत घालणाऱ्या, जैविक संशोधकांच्या संशोधनाच खच्चीकरण करणाऱ्या कॉरपोरेट जगाचं राजकारण उघडकीला आणण्यास रॅचेल कार्सन अजिबात मागेपुढे पहात नाहीत.......उर्वरीत भाग पुढील अंकी.......

–अजित जोशी

शुभं करोति कल्याणं आरोग्यं धन–
संपदा शत्रुबुध्दिविनाशाय
दीपज्योतिर्नमोस्तुते

**Salutations to the light that brings auspiciousness, health, prosperity and abundance; that which destroys hurtful thoughts, feelings and behaviors. To this light I bow down and seek blessings.**

**May you be filled with Light.**

**The Palekar family.**

# <u>Marathi Mandal of North East Ohio</u>

**Preliminary & Unaudited Statement of Accounts**
**As of 10/31/2012**

| | | |
|---|---|---|
| Opening bank balance as of 01-01-2012 | | $17,630.09 |
| Created Bank CD in Charter One Bank | | -$10,000.00 |
| Paid 2011 Pending Bills | | -$738.78 |
| **Net Opening Working Capital as of 01-01-2012** | | **$6,891.31** |
| Mandal Operations | **Income** | **Expenses** |
| Membership Dues (Annual - 2012) | $510.00 | $0.00 |
| Membership Dues (Annual - 2013) | $50.00 | $0.00 |
| Membership Dues (Life) | $665.00 | $0.00 |
| Life membership Transfer to Trustee (3rd Federal) | $0.00 | $700.00 |
| Printing and Publications | $1,275.00 | $1000.00 |
| NEOMM Website | $0.00 | $112.45 |
| FICA Membership Fee for 2012 | $0.00 | $100.00 |
| BMM Membership Fee for 2012 & 2013 | $0.00 | $100.00 |
| Donations | $500.00 | $0.00 |
| Telephone book printing | $0.00 | $168.00 |
| **NEOMM 2012 Events** | | |
| 1. Holi | $1,700.00 | $1,943.23 |
| 2. Bowling Event | $555.00 | $518.00 |
| 3. Garden Club Event | $0.00 | $0.00 |
| 4. Pratapgadache Mantra Yuddha | $870.00 | $870.00 |
| 5. Picnic | $24.00 | $285.04 |
| 6. Ganeshostav | $2,311.00 | $1,654.91 |
| 7. Ek Hotya Shanta Bai | $1454.00 | $1,410.00 |
| 8. Girls Night Out | $0.00 | $0.00 |
| 9. Diwali | $500.00 | $0.00 |
| | | |
| **Total** | **$10,414.00** | **$8,261.63** |
| Change in net working capital assets (Profit / Loss) | **$1,552.37** | |
| Net working capital assets, as of 10/31/2012 | | **$9,043.68** |

| | |
|---|---|
| Note: | |
| Donations received for Pratapgadache Mantra Yuddha | $870.00 |
| Donations received for Ek Hotya Shantabai | $1,401.00 |
| Donations received for FICA | $500.00 |
| Donations received for Diwali | $500.00 |
| **Total Donations Received** | **$3,271.00** |



**Cleveland visit by BMM President Ashish Chaughule – September 2012**




**Music Program Eak Hotya Shantabai – October 2012**




दिवाळी व नविन वर्षाच्या शुभेच्छा

Sharad , Sushama , Esha

& Roma Wankhade




Wish you all a Happy Diwali & Happy New Year

Pediatrics R US & Khadilkar Family

Office Location : Vidula Khadilkar, MD

5162 Broadway Avenue, Suite 4, Cleveland, OH 44127

Phone: (216) 429 0077

॥म॥

{Khapre.org}

a public service initiative

| | www.khapre.org | |

Happy Diwali and Best Wishes



Kishor, Shubhada and Pendse Family

# Best compliments from Mohan & Jayshree Durve

# AYURVEDA 101

***4 Week Class Series on the Power of Holistic Living!***


**Do you need easy and effective ways to maintain or improve your health? Do you wish for more energy, focus, and direction? Do you want to master your mind and emotions with simple techniques that cultivate inner peace and reduce stress?**


Ayurveda, the 5,000-year-old holistic healing system of India and the sister science of Yoga, has the answers you are looking for. Translated as the "Science of Life," Ayurveda shows you the power of lifestyle- how to promote longevity, avoid disease, and live intelligently. Observing daily rituals maximizes your energy, reduces stress, enhances self-awareness, and allows you to live life to your fullest potential. Whether your body type is *Vata* (Air), *Pitta* (Fire), or *Kapha* (Earth), you can strategically avoid imbalance and prevent many diseases. Learn the basics of mindful eating, appropriate exercise for your constitution, the value of meditation and yoga, and how you can start living more intelligently today by embracing an Ayurvedic lifestyle! This comprehensive four-week series is only for those who are motivated to transform their lives!

***Week 1***- Introduction to Ayurveda & Your Body Type
***Week 2***- Living an Ayurvedic Lifestyle
***Week 3***- Following an Ayurvedic Diet
***Week 4***- Ayurvedic Detoxification & Self-Care

*Space is limited so please call 216-767-8435 to register in advance!*
Offered monthly on Wednesdays from 6-8 p.m. Please call for dates.
$200 for series  At University Hospitals Ahuja Medical Building

Class Taught by Anisha Durve, L.Ac. M.S.O.M.
Licensed Acupuncturist
Master of Science in Oriental Medicine
Ayurvedic Practitioner
Yoga Therapist
Meditation Instructor
Co-author of Marma Points of Ayurveda:
Healing Pathways for Body, Mind, & Consciousness
with a Comparison to Traditional Chinese Medicine




Happy Diwali and Best Wishes
from
Ramesh, Gaye & Gavhane Family

**Balance** **Diversification** **Significance**

# B D S

## Financial Service Corporation

# Start taking control of your financial life.

Let an independent financial advisor help you prepare a plan that puts your interests and objectives first.

Call us today for your **financial checkup @ 440-248-5625**.
Let us show you how we can help.

***Ashok Shendure***, MS, MBA, CFP® CEBS®, AIF®, RLP®
***Rajanee Shendure***, MBA, CFP®, AIF®
***Smita Samant***, CFP, AIF®

***www.bdsfsc.com***
***30405 Solon Road #16***
***Solon, Ohio 44139***

PLANNING Pays Off! SM

Securities and advisory services offered through Commonwealth Financial Network, member FINRA/SIPC, a registered investment adviser.